दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -३०४ सोमवार दि.१३ जुलै २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-304 Monday, Dt.13 July 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बळावर बीड पोलिस दलाने केली तपासक्रांती..!

## महाराष्ट्रासाठी पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत यांचा 'बीड पॅटर्न' ठरणार नवा आदर्श.!!

## 'दीपआय'च्या राज्यस्तरीय यशस्वी चाचणीनंतर गृह विभागाचे लक्ष वेधले...!!!

बीड । वैभव स्वामी

बीड शहर पोलिसांनी विकसित केलेल्या 'दीपआय' या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित अत्याधुनिक तपास प्रणालीने राज्यस्तरीय संकल्पना-चाचणी (प्रूफ ऑफ कॉन्सेप्ट) यशस्वीपणे पूर्ण करत महाराष्ट्राच्या गृह विभागाचे लक्ष वेधून घेतले आहे. तपास प्रक्रियेत वेग, अचूकता, पारदर्शकता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून विकसित करण्यात आलेल्या या प्रणालीमुळे भविष्यात महाराष्ट्रातील सर्व





पोलिस दलांसाठी बीडचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या संकल्पनेतील 'बीड पॅटर्न' देशात आदर्श ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

बीड शहर पोलिस ठाण्यात आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय मूल्यमापनात दीपआयच्या तांत्रिक, तपासविषयक आणि कायदेशीर क्षमतेची सखोल चाचणी घेण्यात आली. यासाठी भारतीय तंत्रज्ञान संस्थेचे (आयआयटी) माजी विद्यार्थी तथा 'मिस्टिक एआय सोल्यूशन'चे मुख्य कार्यकारी अधिकारी राजीव सक्सेना, प्रगत संगणक विकास केंद्र (सी-डॅक), पुणेचे संयुक्त संचालक महेश भार्गव आणि भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था (आयआयएसईआर), पुणेचे प्रा. प्रणव गोयल यांच्यासह तज्ज्ञ समितीने प्रकल्पाची बारकाईने तपासणी केली. पोलिस दूरसंचार व माहिती तंत्रज्ञान विभागाच्या मार्गदर्शनाखाली ६५ विविध चाचणी प्रकरणांवर प्रणालीची पडताळणी करण्यात आली. सर्व निकषांवर प्रणाली यशस्वी ठरल्याने तज्ज्ञ समितीने समाधान व्यक्त केले.

दीपआय ही केवळ प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) तयार करणारी प्रणाली नसून गुन्हा नोंदणीपासून न्यायालयीन खटल्याच्या प्रगतीवर देखरेख ठेवण्यापर्यंतची संपूर्ण तपास प्रक्रिया एका डिजिटल व्यासपीठावर आणणारी राज्यातील पहिली टोकापासून टोकापर्यंतची कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित पोलिसिंग व तपास सहाय्य प्रणाली म्हणून विकसित करण्यात आली आहे. तक्रार नोंदणी, प्रथम माहिती अहवालाचा मसुदा, पुरावा व्यवस्थापन, तपास अधिकाऱ्यांना मार्गदर्शन, प्रकरण दिनदर्शिका, आरोपपत्र तयार करणे, वरिष्ठ अधिकाऱ्यांचे थेट पर्यवेक्षण आणि न्यायालयीन खटल्याच्या प्रगतीवर देखरेख अशा सर्व प्रक्रिया या प्रणालीद्वारे हाताळल्या जातात.

या प्रकल्पाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे तपास प्रक्रियेतील वेळेत झालेली मोठी बचत. पारंपरिक पद्धतीने गुंतागुंतीच्या गुन्ह्यांची प्रथम माहिती अहवाल तयार करण्यासाठी तीन ते चार तास लागत असताना दीपआयच्या साहाय्याने प्राथमिक मसुदा अवघ्या तीन ते चार मिनिटांत तयार होत असल्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून सिद्ध झाले. त्यामुळे तपासाला तात्काळ गती मिळत असून पोलिसांचा प्रशासकीय ताण कमी होऊन अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष तपासावर

पान २ वर...

### पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी बदनाम बीडला नवा आदर्श चेहरा दिला..?

साधारण दोन ते तीन वर्षांपूर्वी बीड जिल्हा हा महाराष्ट्रामध्ये बिहार म्हणून चर्चेत आला.मात्र बीडच्या पोलीस अधीक्षक पदाची सूत्रे नवनीत काँवत यांनी घेतल्यानंतर त्यांनी बीड जिल्ह्यातील गुंडगिरी सुता सारखी सरळ केली आहे. पोलीस दलामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत आपली कार्यसिद्धता देखील सिद्ध केली. एकेकाळी बदनाम झालेल्या बीड जिल्ह्याला नव्या सुवर्ण अक्षरात कोरून बीडचे नाव देशात उज्वल करण्यामध्ये खऱ्या अर्थाने गरुड भरारी घेतली आहे.



महाराष्ट्र पोलिस दलाला कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने अधिक वेगवान, पारदर्शक, वैज्ञानिक आणि परिणामकारक बनविण्याचा दूरदृष्टीचा उपक्रम आहे. राज्यभर या प्रणालीची अंमलबजावणी झाल्यास बीड पॅटर्न हा महाराष्ट्रातील आधुनिक पोलिसिंगचा नवा मानदंड ठरू शकतो.बीड पोलिसांनी विकसित केलेला ऊशशिएि्श एआय प्रकल्प हा केवळ एका जिल्ह्याचा तांत्रिक प्रयोग राहिलेला नाही, तर महाराष्ट्राच्या पोलिस व्यवस्थेच्या भविष्यातील दिशेचा पाया ठरण्याची क्षमता त्याने सिद्ध केली आहे. राज्यस्तरीय तज्ज्ञ समितीकडून मिळालेली सकारात्मक दाद आणि यशस्वी Proof of Concept पाहता, महाराष्ट्राला आधुनिक AI-आधारित पोलिसिंगचा मार्ग दाखवणारे बीड अशी ओळख लवकरच निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.

### ३ ते ४ तासांचे काम आता ३ ते ४ मिनिटांत..

ऊशशिएि्श -ख चा सर्वात मोठा परिणाम म्हणजे ऋखठ मसुदा तयार करण्यासाठी लागणारा वेळ. पूर्वी गुंतागुंतीच्या गुन्ह्यांमध्ये FIR तयार करण्यासाठी ३ ते ४ तास लागत होते.आता एआय प्रणालीच्या मदतीने प्राथमिक एफआयआर मसुदा अवघ्या ३ ते ४ मिनिटांत तयार होतो.

### देशासाठीही ठरू शकते 'बीड मॉडेल'

तंत्रज्ञानाचा जबाबदारीने आणि परिणामकारक वापर करून बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या संकल्पनेतील बीड पोलिसांनी उभारलेले हे मॉडेल भविष्यात इतर राज्यांसाठीही मार्गदर्शक ठरू शकते. एआय आधारित आधुनिक पोलिसिंगमध्ये महाराष्ट्राला देशात अग्रस्थानी नेण्याची क्षमता या प्रकल्पात असल्याचे मत अनेक तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

## राज्यभरच नव्हे तर देशभर बीड मॉडेल लागू होण्याची शक्यता..?

## हा केवळ सॉफ्टवेअर प्रकल्प नसून..



## संघर्षाचा वारसा, समाजसेवेची वाटचाल, लखन भैय्या नाईकवाडे तरुणांसाठी प्रेरणास्थान

शिराढोण । प्रतिनिधी

आरपीआय पँथरचे माजी जिल्हा संघटक प्रकाश श्रावण नाईकवाडे यांच्या सामाजिक संघर्षाचा वारसा पुढे नेत त्यांचे सुपुत्र लखन भैय्या नाईकवाडे समाजसेवा आणि स्वाभिमानाची वाटचाल करत आहेत.

प्रतिकूल परिस्थितीतून पुण्यात स्वतःचा व्यवसाय उभा करत त्यांनी आंबेडकरी चळवळीतील सामाजिक, शैक्षणिक व जनहिताच्या उपक्रमांत सक्रिय सहभाग कायम ठेवला आहे. गरजू व वंचितांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पुढाकार घेत असल्याने ते युवकांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व ठरत असून, त्यांच्या कार्याचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## बीडच्या नगर रोडवरील बावळे कॉम्प्लेक्सचा स्लॅब कोसळला

## एसबीआय बँकेचे एटीएम सुविधाचे की दुर्घटनेचे सेंटर ?



बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील नगर रोडवरील पोलिस पेट्रोल पंपाजवळील बावळे कॉम्प्लेक्समधील डइख एटीएमचा स्लॅब दोन दिवसापूर्वी अचानक कोसळल्याने मोठी दुर्घटना थोडक्यात टळली. सुदैवाने घटनेच्या वेळी एटीएममध्ये कोणताही ग्राहक नसल्याने जीवितहानी झाली नाही. मात्र, या घटनेने शहरातील जुन्या व धोकादायक इमारतींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. याची दखल घेऊन नगरपालिका काही क्शन घेणार आहे का ? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

वाढती लोकसंख्या आणि ग्राहकांच्या सोयीसाठी राष्ट्रीयकृत बँकासह विविध बँकांनी जागोजाग एटीएम मशीनची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. हे एटीएम अनेक वर्षांपासून एकाच इमारतीमध्ये आहे. बावळे कॉम्प्लेक्स मधील या घटनेनंतर एटीएमच्या

पान २ वर...

### आज स्लॅब कोसळला, उद्या एखादाचा जीव जाईल.?

नगर रोडवरील बावळे कॉम्प्लेक्स मधील एटीएम च्या इमारतीचा स्लॅब अचानक कोसळला. सुदैवाने जीवित हानी झाली नाही. मात्र भविष्यात या जुन्या इमारतीचा स्लॅप किंवा संपूर्ण इमारत कोसळल्यास होणाऱ्या जीवितहानीची नगरपालिका प्रशासन जबाबदारी घेणार आहे का ? अशाप्रकारे मरणासन्न अवस्थेतील इतर इमारतीवर नगरपालिका बुलडोजर कधी फिरवणार ? का एखाद्याचा जीव गेल्यावर जाग येणार आहे का ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान अशा जुन्या इमारत असलेल्या मालकांनी आणि त्यात राहणाऱ्या किरायदारांनी आजच जागृत होणे गरजेचे आहे तसेच अशा मरणासन्न अवस्थेतील इमारतींवर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे काळाची गरज बनली आहे.



संपादकीय....

## पांडुरंगाच्या दर्शनाचा ध्यास

'ज्ञानोबा-तुकाराम', 'पुंडलिक वरदा हरी विठ्ठल', 'राम कृष्ण हरी' या नामघोषाने दुमदुमणारे महाराष्ट्राचे रस्ते, टाळ-मृदंगाचा गजर, भगव्या पताकांनी सजलेला वारकऱ्यांचा महासागर आणि पंढरपूरच्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास करणारे लाखो भाविक, हे चित्र म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचे जिवंत प्रतीक असलेली पंढरीची वारी होय. ही वारी केवळ धार्मिक यात्रा नसून श्रद्धा, समता, भक्ती, सामाजिक ऐक्य आणि मानवी मूल्यांचा अखंड उत्सव आहे.

आषाढी आणि कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून लाखो वारकरी विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे प्रस्थान करतात. संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आळंदीहून, तर संत तुकाराम महाराजांची पालखी देहूहून निघते. त्यांच्यासोबत महाराष्ट्रातील विविध भागांतून अनेक संतांच्या पालख्या, दिंड्या आणि लाखो वारकरी सहभागी होतात. पायी चालत, मुखी विठ्ठलाचे नामस्मरण करत, अभंग गात आणि एकमेकांना साथ देत वारकरी अनेक दिवसांचा प्रवास पूर्ण करतात. या प्रवासात त्यांना थकवा जाणवत नाही, कारण त्यांच्या मनात 'पांडुरंगाचे दर्शन' हा एकच ध्यास असतो. पंढरीच्या वारीचा इतिहास अत्यंत प्राचीन आहे. संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम यांसारख्या संतांनी वारकरी संप्रदायाला नवी दिशा दिली. त्यांनी समाजाला भक्तीचा, समतेचा आणि मानवतेचा संदेश दिला. जात-पात, श्रीमंती-गरिबी, उच्च-नीच या भेदांपलीकडे जाऊन प्रत्येक माणूस विठ्ठलाचा भक्त आहे, ही शिकवण संतांनी दिली. त्यामुळे वारी ही केवळ देवदर्शनाची यात्रा राहिली नाही, तर समाजप्रबोधनाचे एक प्रभावी माध्यम बनली.

वारकरी संप्रदायाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यामधील समता. वारीमध्ये कोण मोठा आणि कोण लहान असा भेद नसतो. शेतकरी, कामगार, शिक्षक, डॉक्टर, अधिकारी, व्यापारी, विद्यार्थी, महिला, वृद्ध, युवक हे सर्वजण एकाच रांगेत चालतात. सर्वांच्या ओठांवर विठ्ठलाचे नाव आणि मनात भक्तिभाव असतो. एकमेकांना मदत करणे, सेवा करणे, शिस्त पाळणे आणि सामूहिक जीवन जगणे, ही वारीची संस्कृती आहे. म्हणूनच वारीला 'चालते-बोलते विद्यापीठ' असेही म्हटले जाते. विठ्ठलाला 'गरिबांचा देव' असे संबोधले जाते. कारण विठ्ठलाकडे जाण्यासाठी संपत्तीची गरज नसते; गरज असते ती निस्सीम भक्तीची. विटेवर उभा असलेला, कटीवर हात ठेवलेला पांडुरंग आपल्या प्रत्येक भक्ताची समान भावनेने वाट पाहत असतो. भक्ताच्या मनातील प्रेम आणि श्रद्धाच त्याच्यासाठी सर्वात मोठा नैवेद्य असतो. त्यामुळे श्रीमंत असो किंवा गरीब, प्रत्येक वारकऱ्याला विठ्ठल आपलाच वाटतो. हीच भावना लाखो लोकांना दरवर्षी पंढरीकडे खेचून आणते.

# आदर्श समाजसेवक श्री.परिवंत गायकवाड यांचा आज लोकमत बीड भूमिपुत्र समाजरत्न पुरस्काराने होणार गौरव

**समाजसेवा ही केवळ प्रसिद्धीचे साधन नसून ती समाजाप्रती असलेली जबाबदारी आहे, या विचाराने गेली अनेक वर्षे निस्वार्थ भावनेने कार्य करणारे आष्टी तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते, शासकीय गुत्तेदार, उद्योजक, कन्हेवडगावचे आदर्श सरपंच तसेच कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक श्री. परिवंत उत्तम गायकवाड यांना आज प्रतिष्ठेच्या लोकमत बीड भूमिपुत्र समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. ग्रामविकास, समाजसेवा, शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक तसेच जनहिताच्या विविध उपक्रमांमध्ये दिलेल्या मोलाच्या योगदानाची दखल घेत लोकमत समूहाने त्यांची या मानाच्या पुरस्कारासाठी निवड केली आहे.**
**बीड जिल्ह्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा गौरव करण्यासाठी लोकमत समूहाच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येणारा लोकमत बीड भूमिपुत्र पुरस्कार सोहळा हा जिल्ह्यातील अत्यंत प्रतिष्ठेचा सोहळा मानला जातो. समाजासाठी निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या आणि आपल्या कार्यातून इतरांसाठी प्रेरणादायी ठरणाऱ्या व्यक्तींना या व्यासपीठावर सन्मानित केले जाते.**



आष्टी - समाजसेवा ही केवळ प्रसिद्धीचे साधन नसून ती समाजाप्रती असलेली जबाबदारी आहे, या विचाराने गेली अनेक वर्षे निस्वार्थ भावनेने कार्य करणारे आष्टी तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते, शासकीय गुत्तेदार, उद्योजक, कन्हेवडगावचे आदर्श सरपंच तसेच कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक श्री. परिवंत उत्तम गायकवाड यांना आज प्रतिष्ठेच्या लोकमत बीड भूमिपुत्र समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. ग्रामविकास, समाजसेवा, शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक तसेच जनहिताच्या विविध उपक्रमांमध्ये दिलेल्या मोलाच्या योगदानाची दखल घेत लोकमत समूहाने त्यांची या मानाच्या पुरस्कारासाठी निवड केली आहे.

बीड जिल्ह्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा गौरव करण्यासाठी लोकमत समूहाच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येणारा लोकमत बीड भूमिपुत्र पुरस्कार सोहळा हा जिल्ह्यातील अत्यंत प्रतिष्ठेचा सोहळा मानला जातो. समाजासाठी निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या आणि आपल्या कार्यातून इतरांसाठी प्रेरणादायी ठरणाऱ्या व्यक्तींना या व्यासपीठावर सन्मानित केले जाते.

यावर्षी श्री. परिवंत उत्तम गायकवाड यांना जाहीर झालेला समाजरत्न पुरस्कार हा त्यांच्या अनेक वर्षांच्या सातत्यपूर्ण समाजकार्याचा सन्मान मानला जात आहे.

श्री. परिवंत उत्तम गायकवाड यांनी लोकनेते, मराठवाडा भूषण आ. सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली कन्हेवडगावचे सरपंच म्हणून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. गावातील रस्ते, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, स्वच्छता, सार्वजनिक विकासकामे, शासकीय योजनांचा प्रभावी लाभ, ग्रामस्थांच्या अडचणींचे तातडीने निराकरण आणि लोकसहभागातून विकासकामे राबविणे यासाठी त्यांनी सातत्याने परिश्रम घेतले आहेत. त्यांच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता, नियोजन आणि विकासाचा दूरदृष्टीकोन दिसून येतो. त्यामुळे ग्रामस्थांचा त्यांच्यावर मोठा विश्वास आहे.

सामाजिक कार्यातही श्री. गायकवाड यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, या विश्वासातून त्यांनी अनेक वेळा शाळेतील होतकरू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले आहे. गरजू विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहत त्यांच्या शिक्षणाचा प्रवास खंडित होऊ नये, यासाठी त्यांनी वेळोवेळी मदतीचा हात दिला आहे. अनेक विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आत्मविश्वासाचे हास्य फुलविण्यामागे त्यांच्या या संवेदनशील उपक्रमांचा मोठा वाटा आहे.

धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांचे योगदान तितकेच उल्लेखनीय आहे. विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये ते नेहमी सक्रिय सहभाग घेत असतात. विशेषतः अखंड हरिनाम सप्ताह यांसारख्या धार्मिक सोहळ्यांमध्ये त्यांनी भक्तांसाठी सढळ हाताने अन्नदान केले आहे. समाजात एकोपा, बंधुभाव आणि सेवाभाव वृद्धिंगत व्हावा, या उद्देशाने त्यांनी धार्मिक उपक्रमांना सातत्याने सहकार्य केले आहे.

राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील विविध कार्यक्रमांना त्यांनी वेळोवेळी उदारपणे आर्थिक मदत केली आहे. अनेक संस्था, मंडळे, शाळा, सामाजिक उपक्रम आणि लोकहिताच्या कार्यक्रमांना त्यांनी कोणत्याही अपेक्षेशिवाय आर्थिक हातभार लावला आहे. समाजोपयोगी उपक्रम यशस्वी व्हावेत आणि समाजात चांगल्या कार्याला प्रोत्साहन मिळावे, हीच त्यामागील त्यांची भूमिका राहिली आहे.

गरजू, संकटग्रस्त आणि आर्थिक अडचणीत असलेल्या अनेक कुटुंबांना श्री. परिवंत गायकवाड यांनी वेळोवेळी आर्थिक आधार दिला आहे. अनेक कुटुंबांच्या अडचणीच्या काळात ते मदतीसाठी धावून गेले असून, त्यांच्या मदतीमुळे अनेकांना नव्याने उभे राहण्याची ताकद मिळाली आहे. गरजूंना मदत करताना त्यांनी कधीही प्रसिद्धीचा हव्यास ठेवला नाही. शांतपणे आणि निस्वार्थ भावनेने केलेल्या त्यांच्या मदतीमुळे समाजात त्यांच्याबद्दल विशेष आदर आणि विश्वास निर्माण झाला आहे.

गावातील सामाजिक सलोखा टिकविण्यासाठीही त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. गावातील अनेक तंटे, वाद आणि गैरसमज त्यांनी संयमाने, संवादातून आणि समन्वयाने सोडविले आहेत. न्याय्य भूमिका, सर्वांना समान वागणूक आणि गावाच्या हिताला प्राधान्य देण्याच्या त्यांच्या स्वभावामुळे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न शांततेत मार्गी लागले आहेत. त्यामुळे ते केवळ लोकप्रतिनिधी नसून गावातील ज्येष्ठ मार्गदर्शक आणि विश्वासू व्यक्तिमत्त्व म्हणूनही ओळखले जातात.

शासकीय गुत्तेदार आणि उद्योजक म्हणून कार्यरत असतानाही त्यांनी सामाजिक बांधिलकी कधीही विसरली नाही. आपल्या व्यवसायासोबत समाजकारणाचा समतोल साधत त्यांनी अनेक विधायक उपक्रमांना पाठबळ दिले आहे. कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक म्हणूनही त्यांनी शेतकरीहिताला प्राधान्य देत त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले आहे. ग्रामीण विकास, शेतकरी कल्याण आणि सामाजिक उन्नती यांचा समन्वय साधण्याचा त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

शांत, संयमी, अभ्यासू, मनमिळाऊ, दातृत्वशील आणि कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व म्हणून श्री. परिवंत उत्तम गायकवाड यांची संपूर्ण आष्टी तालुक्यात ओळख आहे. समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन विकासाची वाटचाल करण्याचा त्यांचा प्रयत्न आजही अविरत सुरू असून, त्यांच्या कार्याचा लाभ अनेकांना झाला आहे. त्यामुळे त्यांना जाहीर झालेला लोकमत बीड भूमिपुत्र समाजरत्न पुरस्कार हा केवळ त्यांचा वैयक्तिक सन्मान नसून संपूर्ण कन्हेवडगाव आणि आष्टी तालुक्याच्या समाजसेवेचा गौरव असल्याच्या भावना नागरिक व्यक्त करत आहेत.लोकमत समूहाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला हा भव्य पुरस्कार सोहळा सोमवार, दि. १३ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजता दि फर्न रेसिडेन्सी, जळगाव रोड, टाऊन सेंटर, सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न होणार आहे. या सोहळ्यास माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून, प्रसिद्ध सिने अभिनेते अशोक शिंदे तसेच लोकमत मीडिया ग्रुपचे संपादकीय संचालक करण दर्डा यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार असल्याने या सोहळ्याबाबत जिल्हाभरात उत्सुकता निर्माण झाली आहे.

दरम्यान श्री. परिवंत उत्तम गायकवाड यांना समाजरत्न पुरस्कार जाहीर झाल्यानंतर कन्हेवडगावसह आष्टी तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, व्यापारी तसेच सर्व स्तरांतील नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. लोकमत छत्रपती संभाजीनगर (मराठवाडा आवृत्ती) चे संपादक तथा निमंत्रक नंदकिशोर पाटील यांनी या गौरव सोहळ्यास मान्यवरांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पुरस्कार विजेत्यांना शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन केले आहे.

शब्दांकन...
**राजेंद्र लाड,आष्टी**
(मो.९४२३१७०८८५)

# मृत्यू - अटळ सत्य आणि जीवनाचा खरा अर्थ



पिंपरी पुणे -जन्म आणि मृत्यू हे जीवनातील दोन अटळ सत्य आहेत. जन्म हा आनंदाचा क्षण असतो, तर मृत्यू हा दुःखाचा. परंतु या दोन्ही घटना निसर्गाच्या नियमांनुसार घडतात. या दोन टोकांमधील प्रवास म्हणजेच जीवन. जन्माची चाहूल आधीच लागते, पण मृत्यू कधी, कुठे, कसा आणि कोणत्या क्षणी येईल, हे कोणालाच माहीत नसते.

एखाद्या बाळाचा जन्म होणार असल्याचे कुटुंबाला आधीच समजते. आईच्या गर्भात नवीन जीव वाढत असतो. डॉक्टर प्रसूतीची संभाव्य तारीख सांगतात. घरात नवीन पाहुण्याच्या स्वागताची तयारी सुरू होते. बाळासाठी कपडे, पाळणा, खेळणी, नावाची चर्चा आणि आनंदाचे वातावरण असते. प्रत्येकजण नव्या जीवनाच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहत असतो.

परंतु मृत्यूची कोणतीही पूर्वसूचना नसते. तो श्रीमंत-गरीब, राजा-रंक, ज्ञानी-अज्ञानी असा कोणताही भेदभाव करत नाही. मृत्यू हा जीवनाचा अंत नसून आत्म्याच्या अखंड प्रवासातील एक टप्पा आहे. म्हणूनच मृत्यूला घाबरण्याऐवजी त्याचा स्वीकार करायला शिकले पाहिजे.

कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर अर्जुनही आपल्या स्वकीयांचा विचार करून खचला होता. मृत्यूची भीती आणि नात्यांचा मोह यामुळे त्याचे मन विचलित झाले. त्या वेळी भगवान श्रीकृष्णांनी त्याला आत्म्याचे शाश्वत स्वरूप समजावून सांगितले.

ते म्हणतात - वासांसि जीर्णानि यथा विहाय

नवानि गृह्णाति नरोऽपराणि।

तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ।।

(भगवद्गीता - अध्याय २, श्लोक २२)

अर्थः जसा मनुष्य जुनी वस्त्रे टाकून नवीन वस्त्रे धारण करतो, त्याचप्रमाणे आत्मा जुने शरीर सोडून नवीन शरीर धारण करतो. शरीर नश्वर आहे; परंतु आत्मा अमर, अविनाशी आणि शाश्वत आहे.

पुढे श्रीकृष्ण अर्जुनाला मृत्यूचे अटळ सत्य सांगतात -

जातस्य हि ध्रुवो मृत्युध्रुवं जन्म मृतस्य च।

तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ।।

(भगवद्गीता - अध्याय २, श्लोक २७)

अर्थः ज्याचा जन्म झाला आहे त्याचा मृत्यू निश्चित आहे आणि ज्याचा मृत्यू झाला आहे त्याचा पुनर्जन्मही निश्चित आहे. म्हणून जे अपरिहार्य आहे, त्याबद्दल अति शोक करू नये. भगवान श्रीकृष्णांचा हा संदेश केवळ अर्जुनासाठी नव्हता; तो प्रत्येक माणसासाठी आहे. मृत्यू अटळ आहे, परंतु मृत्यू येईपर्यंतचे जीवन कसे जगायचे, हे आपल्या हातात आहे. म्हणूनच श्रीकृष्णांनी कर्मालाच सर्वाधिक महत्त्व दिले आहे.

ते म्हणतात -

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।

मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि ।।

(भगवद्गीता - अध्याय २, श्लोक ४७)

अर्थः मनुष्याला केवळ आपल्या कर्तव्याचे पालन करण्याचा अधिकार आहे; परंतु त्या कर्माच्या फळावर त्याचा अधिकार नाही. म्हणून फळाची अपेक्षा न ठेवता प्रामाणिकपणे आणि निःस्वार्थ भावनेने आपले कर्तव्य करत राहावे. फळाच्या मोहामुळे कर्म सोडू नये.

आजचा माणूस पैसा, पद, प्रतिष्ठा आणि संपत्ती मिळविण्याच्या धावपळीत इतका गुंतून गेला आहे की, नाती, प्रेम, माणुसकी आणि आयुष्यातील सुंदर क्षण यांकडे दुर्लक्ष करतो. उद्या करू, नंतर भेटू, वेळ मिळाला की बोलू असे म्हणता म्हणता अनेक संधी कायमच्या निघून जातात. कारण पुढचा क्षण आपल्या वाट्याला येईलच, याची कोणालाही खात्री नसते.

म्हणून प्रत्येक दिवस ईश्वराने दिलेली अमूल्य भेट समजून जगूया. आपल्या आई-वडिलांचा सन्मान करूया, नाती जपूया, गरजूंना मदत करूया, मनात द्वेष न ठेवता प्रेम पेरूया आणि प्रत्येक क्षण कृतज्ञतेने स्वीकारूया.

या जगातून जाताना आपल्यासोबत संपत्ती, पद, कीर्ती किंवा वैभव जात नाही. मात्र आपल्या कर्मांचे संस्कार आणि कर्मफळे आत्म्याच्या पुढील प्रवासावर परिणाम करतात. म्हणूनच भगवान श्रीकृष्णांनी सत्कर्माला सर्वश्रेष्ठ मानले आहे.

मृत्यू हा जीवनाचा शेवट नाही तो आत्म्याच्या अनंत प्रवासातील एक टप्पा आहे. म्हणून मृत्यूची भीती न बाळगता प्रत्येक दिवस सत्कर्म, प्रेम, सेवा, कर्तव्यभावना आणि ईश्वरभक्तीने जगणे, हाच भगवद्गीतेचा आणि जीवनाचा खरा संदेश आहे. जीवनाची खरी श्रीमंती संपत्तीत नसून, चांगल्या विचारांत, सत्कर्मांत आणि माणुसकीत असते.

जीवनाची लांबी आपल्या हातात नसते पण जीवनाचा अर्थ, त्याची गुणवत्ता आणि त्याचे मूल्य आपल्या विचारांवर, संस्कारांवर आणि कर्मांवर अवलंबून असते.

जन्म आपल्या हातात नसतो, मृत्यूही आपल्या हातात नसतो पण जन्म आणि मृत्यू यांमधील प्रत्येक क्षण कसा जगायचा, हे मात्र पूर्णपणे आपल्या हातात असते. म्हणून प्रत्येक दिवस सत्कर्म, प्रेम, सेवा आणि ईश्वरभक्तीने जगूया. असे जीवन जगूया की आपल्या जाण्यानंतरही आपल्या सत्कर्मांचा सुगंध, प्रेमाची ऊब आणि माणुसकीचा वारसा समाजाच्या हृदयात सदैव जिवंत राहील.

**लेखिका :**
**प्रा. दिपाली नारायण बागनाईक,**
**प्राध्यापिका,**
**डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, पिंपरी, पुणे १८**

पान १ वरून..

**कृत्रिम बुद्धिमत्तेच्या...**

अधिक लक्ष केंद्रित करता येत आहे.

या प्रणालीमध्ये आवाजाचे लेखनात रूपांतर करून तक्रार नोंदणी, थेट आवाजाद्वारे तक्रार नोंदविण्याची सुविधा, ध्वनिचित्रफीत अपलोड, दस्तऐवजांचे अक्षर ओळखून वाचन, गुन्ह्यांचे स्वयंचलित वर्गीकरण, तपासाची संभाव्य दिशा सुचविणे, वैद्यकीय अहवालांचे विश्लेषण, साक्षीदारांच्या जबाबांचे विश्लेषण, विसंगती शोधणे, साक्षीदारांची परस्परसंबंधित मांडणी आणि पुरावा ते आरोपपत्र यातील संबंध स्पष्ट करणारी प्रणाली अशा अत्याधुनिक सुविधा विकसित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे तपास अधिक वैज्ञानिक, वस्तुनिष्ठ आणि पुराव्यावर आधारित होत आहे.

याशिवाय सीसीटीव्ही चित्रफितींचे विश्लेषण, चेहरा ओळख प्रणाली, वाहनांची ओळख, वाहन शोध सुविधा, दूरध्वनी संपर्क नोंदींचे विश्लेषण, संवाद पद्धतींचे विश्लेषण, गुन्हेगार माहिती व्यवस्थापन, प्रतिबंधात्मक कारवाईचा आराखडा, आरोपींचा गुन्हेगारी इतिहास शोधणे आणि अनेक आरोपींच्या भूमिकेचे विश्लेषण अशा सुविधा तपास अधिक वेगवान व परिणामकारक बनवत आहेत. त्यामुळे तपास अधिकाऱ्यांना संशयित व्यक्ती, वाहनांची माहिती, गुन्हेगारी संबंध आणि डिजिटल पुरावे अल्पावधीत उपलब्ध होत आहेत.

विशेष म्हणजे बीड पोलिसांनी सन २०१७ पासून नोंदविण्यात आलेले सर्व प्रथम माहिती अहवाल आणि ८०० हून अधिक आरोपपत्रांचा कृत्रिम बुद्धिमत्ता ज्ञानसंग्रह तयार केला आहे. या डिजिटल ज्ञानसंग्रहामुळे पूर्वीच्या गुन्ह्यांचे विश्लेषण, कायदेशीर संदर्भ, आरोपपत्र लेखन, तपास नियोजन आणि निर्णय प्रक्रियेत अधिक प्रभावी सहाय्य मिळत आहे. तसेच न्यायवैद्यक प्रयोगशाळा, दूरसंचार सेवा प्रदाते, बँका, समाजमाध्यमे, गुन्हे व गुन्हेगार माहिती जाळे, एकात्मिक फौजदारी न्याय प्रणाली आणि ई-न्यायालय यांच्याशी समन्वय साधण्याची क्षमताही या प्रणालीमध्ये विकसित करण्यात आली आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी थेट तपास पडताळणी, प्रलंबित तपासाची सूचना, कालमर्यादा देखरेख, कार्यप्रदर्शन अहवाल आणि न्यायालयीन खटल्याच्या प्रगतीवर देखरेख अशा सुविधा उपलब्ध असल्याने प्रत्येक तपासावर तत्काळ नियंत्रण ठेवणे शक्य झाले आहे. यामुळे तपासातील विलंब कमी होण्यास, कामकाजात पारदर्शकता वाढण्यास आणि उत्तरदायित्व निश्चित करण्यास मोठी मदत होणार आहे.

राज्यस्तरीय तज्ज्ञ समितीने दीपआयच्या तांत्रिक गुणवत्ता, कायदेशीर सुसंगती, उपयुक्तता आणि प्रत्यक्ष वापरातील परिणामकारकतेचे विशेष कौतुक करत हा प्रकल्प आधुनिक पोलिसिंगसाठी महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचे नमूद केले आहे. यशस्वी संकल्पना-चाचणीनंतर महाराष्ट्रभर ही प्रणाली टप्प्याटप्प्याने लागू करण्याबाबत गृह विभाग सकारात्मक विचार करू शकतो, अशी चर्चा सुरू झाली आहे.

राज्यभर दीपआयची अंमलबजावणी झाल्यास महाराष्ट्रातील तपास प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक, वैज्ञानिक आणि एकसमान होईल. दोषसिद्धीचे प्रमाण वाढण्यास मदत होईल, न्यायालयीन प्रक्रिया अधिक प्रभावी बनेल आणि नागरिकांना जलद न्याय मिळण्यास मोठा हातभार लागेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

बीड पोलिसांनी विकसित केलेले 'दीपआय' हे केवळ एका जिल्ह्यापुरते मर्यादित तांत्रिक नवकल्पनेचे उदाहरण नसून, महाराष्ट्राच्या आधुनिक पोलिसिंगचा भविष्यातील आराखडा ठरण्याची क्षमता त्याने सिद्ध केली आहे. गृह विभागाने राज्यभर या प्रणालीची अंमलबजावणी केल्यास कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आधुनिक पोलिसिंगमध्ये महाराष्ट्राचा आदर्श - बीड पॅटर्न अशी नवी ओळख राज्याला मिळू शकते.

**बीडच्या नगर...**

छताचा मोठा भाग कोसळून लोखंडी सळ्या उघड्या पडल्या. काही क्षणांचा फरक पडला असता तर मोठी दुर्घटना घडली असती, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली. ऐन पावसाळ्याच्या तोंडावर या घटनेनंतर बीड शहरातील जुन्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट नियमितपणे होते का ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. नगरपरिषदेने धोकादायक इमारतींची तातडीने तपासणी करून आवश्यक ती कारवाई करावी, तसेच सार्वजनिक वर्दळीच्या ठिकाणांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. जर पावसाने दमदार हजेरी लावली तर अशा जुन्या इमारती मोठ्या प्रमाणात दुर्घटनाग्रस्त होतील.जर यामध्ये जीवित आणि वित्त हानी झाली तर त्याला जबाबदार कोण ?दुसरीकडे, डइख प्रशासनाने संबंधित एटीएम तात्काळ बंद करून तांत्रिक तपासणी करावी आणि ग्राहकांसाठी पर्यायी सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# प्रभाग क्र. १२ मधील एसआयआर कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद



माजलगाव । प्रतिनिधी

प्रभाग क्र. १२ मध्ये नगरसेवक सय्यद रफिक अली व सदानंद (भैय्या) प्रधान यांच्या पुढाकाराने आयोजित एसआयआर कॅम्पला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कॅम्पमध्ये डखठ नोंदणी, कागदपत्रांची पडताळणी, अर्ज भरण्यासाठी मार्गदर्शन आणि शंकांचे निरसन करण्यात आले. ज्येष्ठ नागरिक, महिला व युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. नागरिकांना शासकीय सेवा सुलभपणे उपलब्ध करून देण्यासाठी असे उपक्रम पुढेही सुरू ठेवणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# 'पसायदान' म्हणणाऱ्या चिमुकल्यांना सुरक्षित शाळा कधी ?

महाजनवाडी जिल्हा परिषद शाळेची इमारत धोकादायक, १२५ विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात..?

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील सन १९५४ पूर्वीची जिल्हा परिषद शाळा अत्यंत जीर्ण झाल्याने सुमारे १२५ विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. गळके छत, कोसळणारे प्लास्टर आणि धोकादायक वर्गखोल्यांमुळे पावसाळ्यात जीव मुठीत धरून शिक्षण घ्यावे लागत आहे. नवीन वर्गखोल्यांसाठी जिल्हा वार्षिक नियोजन समितीच्या निधीतून तातडीने तरतूद करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.




मुख्याध्यापक एस. डी. आंधळे यांनी धोकादायक इमारतीबाबत दरवर्षी वरिष्ठांकडे अहवाल पाठवूनही कार्यवाही न झाल्याचे सांगितले. ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी लोकसहभागातून तात्पुरती दुरुस्ती केली असली, तरी कायमस्वरूपी उपाय म्हणून नवीन शाळा इमारत उभारण्याची मागणी जोर धरत आहे.



संभाजीनगर – येथील हॉटेल रामा इंटरनॅशनलमध्ये नगरसेवक तथा स्थायी समितीचे सभापती राजेंद्रजी वैद्य यांच्या कन्या राही वैद्य व अक्षय रेणावीकर यांच्या शुभविवाह सोहळ्यास राज्यपाल नामदार हरीभाऊ बागडे, मंत्री अतुल सावे, माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड, आमदार संजीव जैस्वाल, बीड जिल्हा शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत (आप्पा) नवले, कृष्णा वांगीकर, धनंजय काळे, प्रमोद वैद्य, शिवसेना संघटक विक्रमराजे भोसले, माजी उपजिल्हाप्रमुख जयसिंग (मामा) चुंगडे, पत्रकार-संपादक राजेंद्र शहापुरकर, सतीश नागरे, पोलीस निरीक्षक अविनाश आघाव यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून नवदाम्पत्यास शुभाशीर्वाद दिले.

## माजलगावातील बांधकामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह, चौकशीची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव पंचायत समिती परिसरातील उपअभियंता कार्यालयाचे सुरू असलेले बांधकाम निकृष्ट दर्जाचे असून जुन्या पायावर व आवश्यक आरसीसी संरचनेशिवाय काम सुरू असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य बांधकामगार सेना संघटनेचे तालुकाध्यक्ष नवीदोद्दीन मुस्ताक सिद्दीकी यांनी केला आहे.

या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने स्थळ पाहणी करून चौकशी करावी, काम त्वरित थांबवावे आणि दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. मागणीची दखल न घेतल्यास संघटनेच्या वतीने आमरण उपोषणाचा इशाराही देण्यात आला आहे.

# कै.विठ्ठल जाधव यांच्या स्मरणार्थ वारकऱ्यांची २७ वर्षांची अखंड आरोग्यसेवा

## २०० वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, मेडिकल किट व फळाहाराचे वाटप

गेवराई : प्रतिनिधी

'साधुसंत येती घरा, तोचि दिवाळी दसरा' या संतवचनाचा प्रत्यय देत कै. विठ्ठल जाधव यांच्या स्मरणार्थ पुणे शहरात गेल्या तब्बल २७ वर्षांपासून अखंडपणे वारकरी आरोग्यसेवेचा उपक्रम राबविला जात आहे. संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील मालेगाव येथील माऊलींच्या रथामागील दिंडी क्रमांक १९६ पुण्यात दाखल झाल्यानंतर मार्केट यार्ड परिसरात या सेवाभावी उपक्रमाचे यंदाही उत्साहात आयोजन करण्यात आले. या आरोग्य शिबिरात सुमारे २०० वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर आवश्यक औषधांसह मेडिकल किटचे वाटप करण्यात आले. तसेच वारकऱ्यांच्या प्रवासातील थकवा दूर व्हावा, यासाठी केळी, बिस्किटे आणि विविध फळांचा फळाहार देण्यात आला.

या सेवाभावी उपक्रमाचे आयोजन कै. विठ्ठल जाधव यांच्या स्मरणार्थ त्यांच्या पत्नी श्रीमती सुलभा जाधव या गेल्या २७ वर्षांपासून सातत्याने करत आहेत. त्यांच्या या कार्यात बाळाराजे भाकड, हर्षवर्धन जाधव, संग्राम वारूळे, संकेत घुले, कृष्णा देशमुख, अमोल घुले, सिद्धेश चंदनशिव, मुद्रा ग्रुपचे चेअरमन उमेश दादा पवार, मनीषाताई पवार, केशव चेडे, यश यादव, शौर्य जाधव, डॉ. संतोष पवार, माजी ग्रामपंचायत सदस्य रावसाहेब मामा सपकाळ, दुर्योधन काळे, ऋषिकेश जाधव, छाया घुले यांच्यासह अनेक मान्यवरांचे मोलाचे सहकार्य लाभले.यावेळी दिंडी चालक ह.भ.प. ओमकार महाराज खरात यांचा पुणे पत्रकार संघाचे अध्यक्ष कृष्णा देशमुख व संकेत घुले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच विणेकरी अशोक वाकडे, ह.भ.प. सोपानकाका खरात, राजेंद्र गाडे तसेच भीमसिंह मंडपचे दादासाहेब खरात यांच्यासह अनेक वारकरी सेवकांचाही सन्मान करण्यात आला. उपस्थितांनी वारकऱ्यांना पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.या आरोग्य शिबिरासाठी मानस हॉस्पिटलचे डॉ. विजयकुमार भोर आणि यशवंत हॉस्पिटलच्या डॉ. शुभांगीताई भोर यांनी गेल्या २७ वर्षांपासून सातत्याने वैद्यकीय सहकार्य देत उपक्रमाला बळ दिले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृष्णा देशमुख यांनी केले, तर ज्ञानेश्वर जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानले.




## नगरपालिकेवर सत्ता कोणाचीही असो; पण बीडच्या विकासाची बोबांबोंब

ही काही आजची परिस्थिती नाही. सत्ताधारी बदलले, अधिकारी बदलले, प्रशासन बदलले; मात्र बीडच्या विकासाचे चित्र आजही फारसे बदललेले दिसत नाही. विकासाच्या नावाने कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च झाल्याचे सांगितले जाते; पण प्रत्यक्षात शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, अतिक्रमण आणि मूलभूत सुविधांची अवस्था पाहता हा विकास नेमका कुठे झाला, असा प्रश्न प्रत्येक बीडकराच्या मनात आहे.

शहराच्या विकासासाठी वर्षानुवर्षे कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर झाला. विविध विकासकामांची घोषणा झाली, भूमिपूजन झाले, उद्घाटने झाली; पण त्या निधीचा प्रत्यक्ष लाभ सामान्य नागरिकांपर्यंत किती पोहोचला, याचा स्पष्ट आणि पारदर्शक हिशोब आजही जनतेसमोर आलेला नाही.बीडच्या रस्त्यांची अवस्था संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. खड्ड्यांमुळे अनेक अपघात झाले, अनेकांनी जीव गमावला, अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली. पाणीटंचाई हा तर बीडकरांच्या नशिबी कायमचा आलेला प्रश्न बनला आहे. वर्षानुवर्षे तोच संघर्ष, तीच आश्वासने आणि तीच प्रतीक्षा.

अतिक्रमणाच्या नावाखाली कारवाई होते; मात्र ती सर्वांवर समान निकषाने होते का, हा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. सामान्य माणसावर नियमांचा बडगा, पण प्रभावशाली लोकांबाबत वेगळे निकष दिसतात, अशी भावना जनतेत आहे.

दुसरीकडे घरपट्टी, नळपट्टी आणि इतर करांची वसुली मात्र अत्यंत कडकपणे केली जाते. नागरिकांनी एक दिवस उशीर केला तरी दंड; पण प्रशासनाने वर्षानुवर्षे रखडवलेल्या कामांचा जाब कोण विचारणार? काही नागरिकांकडून पावती नसल्यास पुन्हा वसुली झाल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. त्याचीही चौकशी होणे आवश्यक आहे.मागील काही वर्षानुवर्षे नगरपालिकेला मिळालेल्या प्रत्येक रुपयाचा सार्वजनिक लेखाजोखा जाहीर व्हावा. कोणत्या कामासाठी किती निधी मंजूर झाला, किती खर्च झाला, कामांची गुणवत्ता काय आहे आणि त्याचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांना झाला का, याची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी झालीच पाहिजे. गैरव्यवहार झाला असेल, तर संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई झालीच पाहिजे.

जनतेचा पैसा हा कोणाच्याही मालकीचा नाही. तो जनतेच्या विकासासाठी आहे. त्यामुळे आता घोषणा नकोत... हिशोब द्या. आश्वासने नकोत... उत्तर द्या. आणि कागदावरील विकास नको... बीडकरांना प्रत्यक्ष विकास दाखवा.

लेखन – रुपाली देशपांडे
संपर्क – ८८८८९५५५३९

## बा विठ्ठला... आमचा रस्ता तरी सुधार!




राहुरीकरांचा पांडुरंगाला मार्मिक निरोप

अहिल्यानगर । प्रतिनिधी

राहुरी बसस्थानकाजवळ राष्ट्रीय महामार्गावर लावलेल्या एका मार्मिक फ्लेक्सने नागरिक, वाहनचालक आणि वारकऱ्यांचे लक्ष वेधले आहे. या फलकातून बा विठ्ठला... आमचा रस्ता जाण्या-येण्यायोग्य कर अशी आर्त विनंती पंढरीच्या पांडुरंगापर्यंत पोहोचवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पालखी मार्गावरील रस्त्यांची दुरवस्था, खड्डे, धूळ, वाहतूक कोंडी आणि वारंवार होणारे अपघात यामुळे वाहनचालक त्रस्त झाले आहेत.पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवरही महामार्गाचे काम रखडल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून, हा फ्लेक्स प्रशासनाच्या निष्क्रियतेवर मार्मिक भाष्य ठरत आहे.

# विद्यार्थ्यांनी शारीरिक मानसिक नैतिकदृष्ट्या सक्षम बनणे काळाची गरज - रणवीर पंडित

यमादेवी विद्यालयातील शिवकालीन स्व-संरक्षण प्रशिक्षण शिबिराचा उत्साहात समारोप

गेवराई दि.१२ (प्रतिनिधी) यमादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जातेगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या १२ दिवसीय शिवकालीन स्व-संरक्षण व युद्धकला प्रशिक्षण शिबिराचा उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. यावेळी बोलताना शारदा स्पोर्ट्स केडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शारीरिक मानसिक नैतिकदृष्ट्या सक्षम बनणे काळाची गरज असून त्यासाठी विद्यार्थ्यांनी क्रीडाक्षेत्राकडे वळावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यमादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जातेगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या १२ दिवसीय शिवकालीन स्व-संरक्षण व युद्धकला प्रशिक्षण शिबिराचा उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. समारोपाच्या कार्यक्रमाला शारदा स्पोर्ट्स केडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, माजी जिल्हा परिषद सदस्य साहेबराव पांढरे, शंकर पवार, सरपंच रमेश चव्हाण, पत्रकार दत्ता वाघमारे, राधेश्याम लेंडाळ, रामेश्वर चव्हाण, विशाल पांढरे, शिवाजी धोंडरे, विठ्ठल सोनवणे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

शिबिरात विद्यार्थ्यांनी दांडपट्टा, भाला, काठी, स्व-संरक्षणाची विविध तंत्रे तसेच पारंपरिक मर्दानी खेळांची प्रभावी प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली असून शाळेच्या बदलत्या वाटचालीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

समारोप कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले रणवीर पंडित यांनी



विद्यार्थ्यांनी शारीरिक, मानसिक आणि नैतिकदृष्ट्या सक्षम बनणे ही काळाची गरज असल्याचे सांगत त्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक तथा प्राचार्य सतीश गरड यांच्या नेतृत्वाखाली विद्यालयाने गेल्या काही वर्षांत उल्लेखनीय प्रगती साधली असून शिस्त, गुणवत्तापूर्ण शिक्षण, विविध उपक्रम आणि सकारात्मक शैक्षणिक वातावरणामुळे विद्यालयाची नवी ओळख निर्माण होत असल्याचे यावेळी अनेक मान्यवरांनी नमूद केले. शाळेत कोणत्याही प्रकारच्या राजकारणाला स्थान न देता विद्यार्थ्यांचे हित आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण हेच सर्वोच्च प्राधान्य राहील, असा निर्धारही व्यक्त करण्यात आला.

शिबिरासाठी निःस्वार्थ भावनेने प्रशिक्षण देणारे प्रशिक्षक शरद पाटील यांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला तसेच शाळेच्या प्रगतीसाठी सहकार्य करणाऱ्या ग्रामस्थ, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानण्यात आले.यावेळी शिक्षक प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ, पदाधिकारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किल्ले धारूर युथ क्लबच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न

किल्ले धारूर/प्रतिनिधी

शहरातील सामाजिक कार्यात सतत अग्रेसर असणारी सामाजिक संघटना किल्ले धारूर युथ क्लबच्या वतीने पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचा संदेश समाजात रुजविण्याच्या उद्देशाने आज दि.१२ जुलै रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वस्तीगृह धारूर परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या उपक्रमात विविध प्रकारच्या झाडांच्या रोपांचे लागवड करण्यात आली. एक झाड लावा, पर्यावरण वाचवा हा संदेश दिला पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी झाड लावून त्याचे संवर्धन करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या उपक्रमाला आवर्जून आलेले ज्ञान सागर कोचिंग क्लासेस चे नारायण शिनगारे सर, वसतिगृहाच्या तोडकड मॅडम तसेच किल्ले धारूर युथ क्लबचे फाऊंडर इंजि. संतोष



दुबे, अध्यक्ष अनिल तिवारी, विजय शिनगारे, सुरेश शिनगारे, दत्ता गोरे, सचिव रवि गायसमुद्रे, विशाल दीख्खत, अभयसिंह चौव्हान, ज्ञानेश्वर कदम, बाबासाहेब धेवाडे, कंकाळ सनमान यांच्यासह युथ क्लबचे पदाधिकारी, सदस्य ,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजलगाव ग्रामीण पोलिसांची धडक कारवाई; हातभट्टी दारु निर्मितीसाठीचे रसायन जप्त

## किट्टीआडगावात हातभट्टी दारू अड्ड्यावर छापा; ६०० लिटर रसायनासह तयार दारू जप्त

आष्टी (प्रतिनिधी)

माजलगाव ग्रामीण पोलिसांनी अवैध गावठी हातभट्टी दारू निर्मितीविरोधात मोठी कारवाई करत किट्टीआडगाव (ता. माजलगाव, जि. बीड) येथे दि.१० जुलै रोजी छापा टाकून हातभट्टी दारू तयार करण्यासाठी वापरले जाणारे रसायन, तयार दारू व साहित्य जप्त केले. या कारवाईत एकूण ३५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून संबंधित महिला आरोपी घटनास्थळावरून फरार झाली.

मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत्रे साहेब व मा. पोलीस निरीक्षक श्री. रामोड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई केली. पोलिसांनी मंदाबाई उत्तम जाधव (रा. किट्टीआडगाव) हिच्या ताब्यातून २०० लिटर क्षमतेच्या दोन प्लास्टिक ड्रममधील ४०० लिटर रसायन (किंमत २० हजार), २०० लिटर क्षमतेच्या एका लोखंडी ड्रममधील २०० लिटर रसायन (किंमत १० हजार) तसेच ५० लिटर तयार गावठी हातभट्टी दारू (किंमत ५ हजार) असा एकूण ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

कारवाईदरम्यान पंचांसमक्ष आवश्यक रासायनिक विश्लेषणासाठी (सी.ए.) नमुने घेण्यात आले. त्यानंतर गावठी दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे रसायन, ड्रम, कॅन व इतर साहित्य पंचांसमक्ष घटनास्थळीच नष्ट करण्यात आले. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच आरोपी महिला घटनास्थळावरून पसार झाली.

याप्रकरणी पोलीस अंमलदार आकाश अडागळे यांच्या फिर्यादीवरून मंदाबाई उत्तम जाधव हिच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी



अधिनियम कलम ६५ (ई)(फ) अन्वये माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.ही कारवाई पोउपनि. सचिन शिंदे, पोहेकॉ. शिवनाथ उबाळे, पोअं. आकाश अडागळे व पोअं. किशोर खेत्रे यांनी पंचांच्या उपस्थितीत यशस्वीरीत्या पार पाडली.

## आ. संदीप क्षीरसागरांच्या पाठपुराव्याला यश

# बीड एसटी आगाराच्या ताफ्यात ५ अत्याधुनिक 'राजमाता जिजाऊ' बसेस दाखल

बीड(प्रतिनिधी): बीड मतदारसंघातील प्रवाशांची गैरसोय दूर करण्यासाठी आणि एसटीचा प्रवास अधिक गतिमान करण्यासाठी आमदार संदीप क्षीरसागर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला श यश आले आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (चडठढउ) वतीने बीड आगारासाठी अत्यंत आधुनिक आणि हाय-टेक अशा ५ नवीन 'राजमाता जिजाऊ' बसेस मंजूर करण्यात आल्या असून, त्या बसेस बीड आगारात दाखल झाल्या आहेत. अधिक आसन क्षमता आणि कडक सुरक्षा यंत्रणा असलेल्या या नव्या बसेसमुळे जिल्ह्यातील प्रवासी वाहतुकीचा चेहरामोहरा बदलणार आहे.

बीड जिल्ह्यातील मुख्य आणि ग्रामीण मार्गांवरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे. अनेकदा बसमध्ये जागा न मिळाल्याने प्रवाशांना उभे राहून किंवा ताटकळत प्रवास करावा लागत होता. प्रवाशांची हीच अडचण ओळखून आमदार संदीप क्षीरसागर यांनी परिवहन मंत्रालयाकडे बीड आगाराला नवीन बसेस देण्याबाबत सातत्याने मागणी केली होती. अखेर त्यांच्या या प्रयत्नांना यश आले असून ५ नव्या दमाच्या 'राजमाता जिजाऊ' बसेस बीडकरांच्या सेवेत रुजू झाल्या आहेत. त्यामुळे गर्दीच्या मार्गांवर प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

'राजमाता जिजाऊ' बसेसमध्ये अत्याधुनिक ३ बाय २ ची आसन रचना करण्यात आलेली आहे. यामुळे बसची एकूण क्षमता ५५ ते ५६ आसनांची झाली असून, नेहमीच्या बसपेक्षा यामध्ये १५ ते १६ आसने जास्त आहेत. परिणामी, प्रवाशांना उभे राहून प्रवास करावा लागणार नाही. तसेच प्रवाशांच्या आणि विशेषतः महिलांच्या सुरक्षेसाठी बसच्या आत आणि बाहेर ४ हाय-डेफिनिशन सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत व बसमध्ये रिअल-टाईम ट्रॅकिंगसाठी जीपीएस (ऋझड) यंत्रणा आणि पुढील स्थानकाची माहिती देणारा इलेक्ट्रॉनिक मार्ग फलक (स्मार्ट डॅशबोर्ड) लावण्यात आलेला आहे. त्यासोबतच प्रवासात कोणतीही आणीबाणीची परिस्थिती किंवा दुर्घटना घडल्यास प्रवाशांच्या सुरक्षेसाठी 'पॅनिक बटण' आणि अलार्म सिस्टीम देण्यात आली असून प्रवाशांना आवश्यक सूचना देण्यासाठी बसमध्ये अनाउन्समेंट सिस्टीमची विशेष सोय आहे. आणि सर्वात विशेष म्हणजे महाराष्ट्राच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरेचा सन्मान राखत या बसेस आकर्षक भगव्या आणि पांढऱ्या रंगात डिझाइन करण्यात आलेल्या आहेत.

दरम्यान महाराष्ट्राच्या आराध्य परंपरेचे प्रतीक असलेल्या आणि हाय-टेक तंत्रज्ञानाने सज्ज 'राजमाता जिजाऊ' बसेस बीड आगारात दाखल होताच एसटी कर्मचाऱ्यांनी आणि नागरिकांनी



मोठा आनंद व्यक्त केला आहे. सर्वसामान्यांच्या हक्काची वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी आणि प्रवाशांचा प्रवास थकवामुक्त करण्यासाठी हे महत्वाचे पाऊल असल्याने आ.संदीप क्षीरसागर यांचे सर्वसामान्य जनतेतून आभार मानले जात आहेत.

## अंबाजोगाईत दगडाने ठेचून २३ वर्षीय

# तरुणाची निर्घृण हत्या

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातून धक्कादायक घटना घडली आहे. तालुक्यातील घाटनांदूर येथील अण्णाभाऊ साठे चौकात शनिवारी रात्री एका २३ वर्षीय तरुणाला दगडाने ठेचून त्याची हत्या करण्यात आली आहे.या भीषण हल्ल्यात मृत तरुणाचा मित्रही गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर सध्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.

ज्ञानेश्वर वाकडे (२३ वर्ष, रा. पट्टीवडगाव) असे या मृत झालेल्या दुर्दैवी तरुणाचं नाव आहे. शनिवारी रात्री ज्ञानेश्वर हा आपल्या एका मित्रासोबत दुचाकीवरून घाटनांदूर येथून पट्टीवडगावच्या दिशेने चालला होता. ते घाटनांदूरमधील अण्णाभाऊ साठे चौकात पोहोचले असता, काही अज्ञात इसमांनी त्यांची दुचाकी अचानक थांबवली. काही समजण्याच्या आतच, दबा धरून बसलेल्या हल्लेखोरांनी ज्ञानेश्वर आणि त्याच्या मित्रावर दगड आणि विटांनी अमानुष हल्ला चढवला. या मारहाणीत गंभीर दुखापत झाल्यामुळे ज्ञानेश्वर वाकडे याचा जागीच मृत्यू झाला. तर त्याच्यासोबत असलेला मित्र



या हल्ल्यात गंभीररीत्या जखमी झाला आहे. त्याला तातडीने अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, हा जीवघेणा आणि टोकाचा हल्ला नेमक्या कोणत्या जुन्या वादातून किंवा कोणत्या कारणावरून करण्यात आला, हे अद्याप समजू शकलेलं नाही.या घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली. मृत ज्ञानेश्वरच्या नातेवाईकांनी तक्रार देण्यासाठी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गर्दी केली होती. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, अंबाजोगाई ग्रामीण पोलीस मारेकऱ्यांचा शोध घेत आहेत. मात्र, या थरारक घटनेमुळे बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# बदलत्या टिळक रोडवर जुन्या बीडचा शोध.. वास्तु बदलल्या पण आठवणी अजूनही जिवंत..!

श्रीकांत लॉज, विसावा हॉटेल, थिगळे वाडा, सार्वजनिक वाचनालय ते संग्राम सेनानी रामलिंग स्वामी यांचे घर... काळाच्या ओघात रूप पालटले, पण स्मृती आजही मनात ताज्याच

बीड । गुलाब भावसार यांजकडून

संत मुक्ताबाईंच्या पालखीचे दर्शन घेऊन परतताना बीड शहरातील टिळक रोडवरून जात असताना अनेक जुन्या आठवणी पुन्हा जाग्या झाल्या. आधुनिक इमारती, आकर्षक शॉपिंग कॉम्प्लेक्स आणि बदललेले रस्ते पाहताना कधीकाळी या परिसराची ओळख ठरलेल्या वास्तू आणि व्यक्ती डोळ्यांसमोर उभ्या राहिल्या.

टिळक रोडवरील श्रीकांत लॉज, विसावा हॉटेल, स्वातंत्र्यसैनिक रामलिंग स्वामी यांचे संग्राम निवासस्थान, थिगळे कुटुंबाचा भव्य




वाडा, सार्वजनिक स्वच्छतागृह आणि त्याच परिसरातील बीड जिल्ह्यातील पहिले सार्वजनिक वाचनालय ही त्या काळातील शहराची महत्त्वाची ओळख होती. माळवेस मंदिरासमोरील काबरा यांचे हिंदुस्तान जनरल स्टोअर हे विद्यार्थ्यांसाठी शालेय पुस्तकांचे प्रमुख केंद्र मानले जात असे.

विसावा हॉटेलचा चहा, श्रीकांत लॉजमधील खानावळ, ओपळकर कुटुंबाची शैक्षणिक परंपरा, थेटे परिवाराने सुरू केलेली पुस्तकांची परंपरा आणि डॉ. सुनील राऊतमारे यांच्या दवाखान्याच्या आठवणी आजही अनेकांच्या मनात घर करून आहेत. तसेच मराठवाडा मुक्ती संग्रामातील अग्रगण्य स्वातंत्र्यसैनिक रामलिंग स्वामी यांच्या वास्तव्याने या परिसराला वेगळी ऐतिहासिक ओळख मिळाली होती.

आज या सर्व जागांवर आधुनिक इमारती उभ्या राहिल्या असून टिळक रोडचे रूप पूर्णपणे बदलले आहे. जुन्या वास्तूंचा मागमूसही दिसत नसला तरी त्या वास्तूंशी जोडलेल्या आठवणी मात्र आजही असंख्य बीडकरांच्या मनात जिवंत आहेत. शहर बदलले, रस्ते बदलले, इमारती बदलल्या; पण जुन्या बीडची ओढ आणि त्या काळातील माणुसकीचा सुगंध अजूनही स्मृतींमध्ये तितकाच दरवळत आहे.

जुन्या बीडच्या या आठवणी जपणे हीच शहराच्या इतिहासाला दिलेली खरी मानवंदना ठरेल, अशी भावना अनेक ज्येष्ठ नागरिक व्यक्त करत आहेत.

## गोदरी ते पंढरपूर पायी वारी दिंडी सोहळाचे दत्त संस्थान

# बालाघाट येथे उत्स्फूर्त स्वागत; वारकऱ्यांसाठी नास्ता व प्रसादाची सेवा

बीड । प्रतिनिधी

वै. प. पू. गु. राजाभाऊ बापूजी नानोटे महाराज संस्थान, गोदरी (ता. चिखली, जि. बुलढाणा) येथून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात, आनंदात आणि भक्तिमय वातावरणात पायी दिंडी प्रस्थान झाली आहे. विठ्ठल नामाचा अखंड गजर, टाळ-मृदुंगाचा निनाद आणि हरिनामाच्या गजरात वारकरी भक्तिभावाने पंढरीच्या दिशेने वाटचाल करत आहेत.

या पायी दिंडीचे आज रविवार दिनांक १२ जुलै २०२६ रोजी सकाळी श्री दत्त संस्थान, बालाघाट, कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे अत्यंत भावपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. संस्थानच्या वतीने दिंडीतील सर्व वारकरी, भाविक आणि सेवेकऱ्यांसाठी प्रेमपूर्वक नाश्त्याची व प्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. वारकऱ्यांनी आनंदाने प्रसादाचा लाभ घेत संस्थानच्या सेवाभावाचे कौतुक केले.

वारकरी संप्रदायात सेवा, समर्पण आणि भक्तीला विशेष महत्त्व आहे. त्याच परंपरेचे जतन करत श्री दत्त संस्थानच्या



वतीने वारकऱ्यांची मनोभावे सेवा करण्यात आली. वारकऱ्यांनी विठ्ठल-रखुमाईंच्या नामस्मरणात तल्लीन होत पुढील प्रवासाला प्रारंभ केला.

यावेळी उपस्थितांनी श्री विठ्ठल-रखुमाई तसेच श्री दत्तप्रभूंच्या चरणी प्रार्थना करत, वारकऱ्यांची सेवा अखंड सुरू राहो, सर्व भाविकांना उत्तम आरोग्य लाभो आणि ही पवित्र वारी सुखरूप पूर्ण होवो, अशी भावना व्यक्त केली.

भक्ती, सेवा आणि समर्पणाचा सुंदर संगम अनुभवायला मिळालेल्या या कार्यक्रमामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. यावेळी उपस्थितांनी श्री विठ्ठल-रखुमाईंचे नामस्मरण करत भक्तीभावाने सेवा कार्यात सहभाग नोंदविला. वारकऱ्यांची सेवा हीच ईश्वरसेवा मानत श्री दत्त संस्थानच्या वतीने ही सेवा दरवर्षीप्रमाणे भावपूर्ण वातावरणात पार पडली.

श्री विठ्ठल-रखुमाई यांच्या कृपेने वारकऱ्यांची ही सेवा अखंड सुरू राहो, अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली.

# चौकशीचा फार्स नको, संबंधित अधिकारी व कंपनीवर गुन्हा दाखल करा - सुषमा अंधारे



पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

मोशी कचरा डेपो दुर्घटनेतील मृत कामगारांच्या कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे संबंधित अधिकारी आणि वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प चालविणाऱ्या कंपनीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

ही दुर्घटना नैसर्गिक नसून मानवनिर्मित असल्याचा आरोप करत त्यांनी मृतांच्या कुटुंबीयांना योग्य आर्थिक मदत, दोषींवर निलंबनाची कारवाई आणि गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. अन्यथा न्यायालयीन लढा व तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला.

# पावसाळी अधिवेशनात संयुक्त महाराष्ट्र पत्रकार महासंघाच्या मुंबई अध्यक्षपदी नियुक्तीबद्दल मान्यवर मंत्र्यांनी केले अभिनंदन




मुंबई - येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशना दरम्यान उपमुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे, कॅबिनेट मंत्री शिवेंद्रराजे भोसले, दत्तात्रय भरणे, जयकुमार गोरे आणि जयदीप रावल यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी संयुक्त महाराष्ट्र पत्रकार महासंघाच्या मुंबई अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांनी मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# जायभायवाडी येथून वारी योजनांची जनजागृती अभियानास उत्साहात प्रारंभ




**ग्रामऊर्जा ह्युमन डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

किल्ले धारूर /प्रतिनिधी

ग्रामऊर्जा ह्युमन डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या वतीने आयोजित वारी योजनांची या विशेष जनजागृती अभियानाचा शुभारंभ आज धारूर तालुक्यातील जायभायवाडी येथून उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला.

दि. १२ जुलै ते २० जुलै या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या अभियानाद्वारे शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, पंचायत राज व्यवस्था, ग्रामसभा, नागरिकांचे हक्क व कर्तव्ये तसेच शासकीय योजनांचा लाभ घेण्याची प्रक्रिया याविषयी ग्रामीण नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे.

अभियानाच्या पहिल्या दिवशी जायभायवाडी येथील ग्रामस्थ, महिला, युवक आणि शेतकरी यांच्याशी संवाद साधून विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. तसेच नागरिकांच्या शंकांचे निरसन करून योजनांचा अधिकाधिक लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले.

ही वारी योजनांचीअंबाजोगाई व धारूर तालुक्यातील विविध गावांमध्ये राबविण्यात येणार असून, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजनांची माहिती पोहोचविण्याचा आणि नागरिकांचा पंचायत राज व्यवस्थेतील सहभाग वाढविण्याचा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

ग्रामऊर्जा ह्युमन डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, आगामी दिवसांतही विविध गावांमध्ये जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.चला, योजना समजून घेऊया... एक जबाबदार नागरिक बनूया! या संदेशासह अभियानाची पुढील वाटचाल सुरू राहणार आहे.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी ग्रामपंचायत जायभायवाडी व ग्राम उर्जा फाउंडेशन अंबाजोगाई व ग्रामस्थ ,महिला यांचे सहकार्य लाभले.


हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# १९ दिवसांचा शिक्षकांचा संघर्ष अखेर फळाला




## वाढीव टप्पा अनुदानाची घोषणा

मुंबई । प्रतिनिधी

आझाद मैदानावर सलग १९ दिवस आंदोलन करणाऱ्या अंशतः अनुदानित शिक्षकांच्या संघर्षाला अखेर यश मिळाले. शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी पात्र शाळांना ३१ मार्च २०२७ पासून वाढीव टप्पा अनुदान लागू करण्यात येणार असल्याची घोषणा केली. त्यानंतर आंदोलनस्थळी शिक्षकांनी जल्लोष केला.

या आंदोलनाला विविध लोकप्रतिनिधींनी पाठिंबा दिला. विशेषतः आमदार रोहित पवार यांनी शिक्षकांच्या मागण्यांसाठी घेतलेल्या ठाम भूमिकेमुळे हा प्रश्न शासनासमोर अधिक प्रभावीपणे मांडला गेला. शासनाने निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करून अनुदानाची रक्कम पात्र शिक्षकांच्या खात्यात जमा करावी, अशी अपेक्षा आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. यावेळी शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या समवेत जलसंपदा मंत्री गिरीश महाजन,

आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे आणि आमदार मंगेश चव्हाण यांनी आंदोलन स्थळी उपस्थित राहून शासनाचा निर्णय जाहीर केला. या निर्णयानंतर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आंदोलनामध्ये सहभागी होण्यासाठी आलेल्या शिक्षकांनी जल्लोष करून या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करून वाढीव टप्पा अनुदानाची रक्कम ही वेळेमध्ये पात्र शिक्षकांच्या खात्यात जमा करावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

# शेवगावातून २६ आरोपींची नाशिक मध्यवर्ती

## कारागृहात रवानगी

अहिल्यानगर । प्रशांत बाफना

शेवगाव पोलीस ठाण्यातील विविध गुन्ह्यांमध्ये अटक करण्यात आलेल्या २६ आरोपींना शनिवारी कडेकोट पोलीस बंदोबस्तात नाशिक मध्यवर्ती कारागृहात रवाना करण्यात आले. आरोपींना कारागृहात पाठविण्यापूर्वी त्यांचे नातेवाईक, महिला व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने पोलीस ठाणे परिसरात जमा झाले होते. भेटी दरम्यान अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळल्याने काही काळ वातावरण भावनिक झाले.

कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी संपूर्ण परिसरात कडक बंदोबस्त ठेवला होता. आरोपींना पोलिसांच्या वाहनातून सुरक्षा व्यवस्थेसह नाशिक कारागृहात पाठविण्यात आले. एकाचवेळी २६ आरोपींची झालेली रवानगी आणि पोलीस ठाण्यातील गर्दीमुळे या घटनेची शेवगाव शहरात दिवसभर चर्चा सुरू होती.


# मान्सून पुन्हा सक्रिय; पुढील १२ तासांत १४ राज्यात वादळी पावसाचा इशारा, कुठेकुठे कोसळधारा?




दोन दिवसांपूर्वीपर्यंत उत्तर भारतातील राज्यांमध्ये धुमाकूळ घालणारा मान्सूनचा पाऊस पुन्हा एकदा ओसरताना दिसत आहे. दिल्ली-एनसीआरमध्ये पावसाची कोणतीही चिन्हे नाहीत, तर मान्सूनचा हंगाम असूनही राजस्थानच्या बहुतांश भागात कडक उन्हाचा तडाखा जाणवत आहे. दरम्यान, हवामान विभागाने १४ राज्यांमध्ये वादळी पाऊस आणि विजांच्या कडकडाटासह पावसाचा इशारा दिला आहे. तसेच, पुढील १२ तासांत वाऱ्याचा वेग ताशी ७५ किमीपर्यंत पोहोचण्याची शक्यता असल्याने सतर्कतेचा इशाराही जारी करण्यात आला आहे.

भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, मान्सूनचा पट्टा सध्या हरियाणा आणि उत्तर प्रदेशपासून मणिपूरपर्यंत विस्तारलेला आहे. याव्यतिरिक्त, उत्तर बांगलादेश आणि लगतच्या भागांवर चक्राकार वाऱ्यांची स्थिती (सायक्लोनिक सर्क्युलेशन) निर्माण झाली असून, ती समुद्रसपाटीपासून १.५ किमी उंचीपर्यंत विस्तारलेली आहे. पुढील २-३ दिवसांत ईशान्य भारत, पश्चिम बंगाल आणि बिहारमधील काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्याच वेळी, पुढील ४-५ दिवसांत पूर्व उत्तर प्रदेशातील काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे.

# मराठवाड्यातील दूध संकलन एका महिन्यात तब्बल १ लाख लिटरने घटलं



मराठवाड्यात बनावट दूध विक्रेत्यांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने सुरू केलेल्या धडक कारवाईचा मोठा परिणाम आता दिसू लागलाय. अशातच अवघ्या एका महिन्यात मराठवाड्यातील दूध संकलन तब्बल १ लाख लिटरने घटलं आहे. एफडीएच्या कारवाईमुळे भेसळयुक्त दूध विक्रीला आळा बसत असल्याचे चित्र आहे. मराठवाड्यात बनावट आणि भेसळयुक्त दूध विक्रेत्यांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने गेल्या महिनाभरात मोठी मोहीम हाती घेतली आहे. अनेक ठिकाणी छापे टाकून कारवाया करण्यात आल्या. या कारवाईनंतर दूध संकलनात लक्षणीय घट झाल्याचं चित्र समोर आलं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मे महिन्यात मराठवाड्यात दररोज १९ लाख ३९ हजार लिटर दूध संकलित होत होतं.

# या बाबा चालून पाय दुखतात का ?मग आम्ही तेल लावून देतो !

मानूर प्रतिनिधी ह्व

आपल्याला पायी चालत जाणे शक्य होत नाही ना मग जे वारकरी पायी जातात त्यांची चरणसेवा करू या भावनेतून नाथबाबांच्या वारक-यांची या बाबा तुमचे पाय दुखतात का ? मग आम्ही थोडे तेल लावून पायाची मालीश करून देतो म्हणत मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष , प्राथमीक आरोग्य केंद्र श्री साई सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा भाग्यश्री ढाकणे यांच्या संयुक्त विद्यमाने चरणसेवा हा उपक्रम राबवत शेकडो माय माऊली व वारकरी बाबांच्या चरण सेवा केली .

आषाढी एकादशी आली की दिंड्या पालख्या बरोबर हजारो भाविक वेळ काढून पायी जातात , उन, वारा, पाऊस , सोय , गैरसोय याची तमा न बाळगता पायी चालत जाणा-या वारक-याबाबत आदरभाव दाखवला जातो , जमेल त्या सेवेत सहभाग नोंदवला जातो . गरजेच्या वस्तु वाटप , आरोग्य सेवा, अन्नदान याशिवाय प्रत्यक्ष सेवा म्हणून चरणसेवा करण्यात सहभाग नोंदवला जात आहे , पाय चोळून दिल्यानंतर वारकरी मनातून अशिर्वाद देतात .



चरणसेवा हा उपक्रमात सिध्देश्वर संस्थानचे उत्तराधिकारी महंत विवेक महाराज शास्त्री यांचेसह तहसिलदार सुरेश घोळवे , मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष प्रमुख डॉ चैतन्य कागदे , प्रथम नगराध्यक्ष रोहीदास पाटील , वैद्यकीय अधिकारी पुजा म्हस्के यांचेसह आरोग्य कर्मचारी , जगदीश चेमटे , प्राचार्य केशव भांगे , महेश डोंगरे , भजनी मंडळ या सर्वांनी सहभाग घेऊन उपक्रम यशस्वी केला .

# वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या संतवचनाचा वारसा जपत घाटशिळा विद्यालयात वृक्षसंवर्धनाचा संकल्प

## वृक्षारोपणाने एम.बी.सानप यांच्या मुख्याध्यापकपदाची सुरुवात

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे या संत तुकाराम महाराजांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवत घाटशिळा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, घाटशिळा येथे नूतन मुख्याध्यापक एम. बी. सानप यांनी आपल्या पदभाराची सुरुवात वृक्षारोपण करून केली. पदग्रहणाच्या पहिल्याच दिवशी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये, शिक्षकांमध्ये आणि समाजामध्ये वृक्षसंवर्धनाची जाणीव निर्माण करण्याचा प्रेरणादायी उपक्रम राबविला.

शनिवारी दुपारी विद्यालयाच्या प्रांगणात परिपाठ पार पडल्यावर साप्ताहिक परीक्षा घेण्यात आली. त्यानंतरच्या मध्यंतरात विद्यालय परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात मुख्याध्यापक एम. बी. सानप यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

वृक्षारोपणानंतर सर्वांनी वृक्षांचे संगोपन करण्याची सामूहिक शपथ घेत पर्यावरण संरक्षणाचा संकल्प केला. घाटशिळा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा परिसर अनेक वर्षांपासून हिरवाईने नटलेला आहे. विद्यालयाच्या इमारतीसमोर उभे असलेले विशाल, डेरेदार वडाचे वृक्ष परिसराला शांत, प्रसन्न आणि आल्हाददायक वातावरण प्रदान करतात. या नैसर्गिक सौंदर्यामुळे परिसरातील नागरिक आणि



विद्यार्थ्यांमध्ये या विद्यालयाची वडांची शाळा अशी विशेष ओळख निर्माण झाली आहे. या वृक्षांच्या शीतल सावलीमुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आणि विविध उपक्रमांसाठी अनुकूल वातावरण मिळत असल्याने विद्यालयाचा परिसर अधिक आकर्षक बनला आहे.

यावेळी मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक एम. बी. सानप यांनी सांगितले की, निसर्ग, वृक्ष, वेली, फुले आणि मानवी जीवन यांचे नाते हे पूर्वापार अतूट असून पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षसंवर्धन अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली, तर भविष्यातील पिढ्यांना समृद्ध आणि सुरक्षित पर्यावरणाचा वारसा मिळेल. त्यांच्या या संदेशाचे विद्यार्थ्यांनी आणि उपस्थितांनी स्वागत केले. वृक्षारोपणाच्या माध्यमातून मुख्याध्यापक एम. बी. सानप यांनी आपल्या कार्यकाळाची पर्यावरणपूरक सुरुवात करत विद्यालयात सामाजिक उत्तरदायित्व, पर्यावरणप्रेम आणि निसर्गसंवर्धनाची नवी दिशा दिल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून पर्यावरण संरक्षणाच्या चळवळीला बळ देणारा असल्याचे मतही अनेकांनी व्यक्त केले.

# अंबड तालुक्यात अंगणवाडी पोषण आहार व रेशन धान्याच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी तातडीने धाडसत्र राबवावे

## निकृष्ट धान्य दर्जाहीन पोषण आहार अळ्या-जाळ्यांच्या तक्रारी दोषींवर कठोर कारवाईची नागरिकांची जोरदार मागणी

अंबड प्रतिनिधी :-

तालुक्यातील अंगणवाडी केंद्रांमधून बालके गर्भवती महिला व स्तनदा मातांना वितरित करण्यात येणाऱ्या पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत तसेच सार्वजनिक वितरण प्रणाली रेशन अंतर्गत मिळणाऱ्या धान्याच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना व्यक्त होत आहे. या संपूर्ण प्रकरणाची अन्न व औषध प्रशासनाने उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.नागरिकांच्या म्हणण्यानुसार बालकांच्या शारीरिक व बौद्धिक विकासासाठी तसेच गर्भवती आणि स्तनदा मातांच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला पोषण आहार शासनाच्या निकषांनुसार दर्जेदार असणे आवश्यक आहे. मात्र काही भागांत पोषण आहाराच्या दर्जाबाबत साठवणुकीबाबत आणि वितरण प्रक्रियेबाबत सातत्याने तक्रारी समोर येत असल्याचा दावा करण्यात येत आहे.यासोबतच रेशन दुकानांतून वितरित होणाऱ्या तांदूळ, गहू व इतर धान्याच्या गुणवत्तेबाबतही लाभार्थ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. काही ठिकाणी तुटलेले तांदूळ निकृष्ट दर्जाचा गहू तसेच पोषण आहारामध्ये अळ्या किंवा जाळे आढळल्याच्या तक्रारी होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या तक्रारींची निष्पक्ष चौकशी करून तथ्य आढळल्यास संबंधित पुरवठादार कंत्राटदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.नागरिकांनी अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्वतः या प्रकरणात लक्ष घालून अंबड तालुक्यात विशेष तपासणी मोहीम राबवावी अशी मागणी केली आहे. अंगणवाडी केंद्रे व रेशन दुकाने यांना अचानक भेटी देऊन साठवणूक स्वच्छता वितरण प्रक्रिया वेळेचे पालन आणि लाभार्थ्यांना मिळणाऱ्या धान्याच्या गुणवत्तेची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात यावी अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.तसेच पोषण आहार व रेशन धान्याचे नियमित नमुने घेऊन अधिकृत प्रयोगशाळेत तपासणी करावी तपासणी अहवाल सार्वजनिक करावेत वितरण व्यवस्थेत पारदर्शकता आणावी आणि लाभार्थ्यांच्या तक्रारींच्या त्वरित निवारणासाठी प्रभावी यंत्रणा उभारावी अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.अन्न व औषध प्रशासन महिला व बालविकास विभाग तसेच अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांनी समन्वयाने कार्य करून गरजू लाभार्थ्यांना सुरक्षित स्वच्छ आणि दर्जेदार अन्नधान्य उपलब्ध करून देण्यासाठी तातडीने कठोर उपाययोजना कराव्यात. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दरमहा नियमित तपासणी करून अहवाल सादर करण्याची सक्ती करण्यात यावी, अशीही नागरिकांची मागणी आहे.शासनाच्या पोषण व अन्नसुरक्षा योजनांचा लाभ खऱ्या अर्थाने पात्र लाभार्थ्यांपर्यंत गुणवत्तापूर्ण स्वरूपात पोहोचण्यासाठी संबंधित यंत्रणांनी तातडीने कारवाई करणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे स्पष्ट मत आहे. त्यामुळे आता अन्न व औषध प्रशासन या प्रकरणात किती तत्परतेने कारवाई करते याकडे संपूर्ण अंबड तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# प्रसिद्ध उद्योजक मंदार भारदे यांच्या मार्गदर्शनातून लोंढे पाटील यांनी हॉटेल व्यवसायात घेतली भरारी

नवीन नांदेड- मोबाईल वरील ग्रुपचा वाचन कट्टा माध्यमातून प्रा.डॉ.विश्वाधार देशमुख नंयांच्या समन्वयातून प्रेरणेचा प्रवास उपक्रमातील तरुण तेजांकित प्रसिद्ध भारतीय उद्योजक, हवाई पर्यटन तज्ज्ञ आणि मॅब एव्हिएशन या खाजगी विमान व हेलिकॉप्टर सेवा पुरवणाऱ्या कंपनीचे संस्थापक व संचालक मंदार अनंत भारदे यांनी लोंढे पाटील यांचे हॉटेल छत्रपती येथे भेट देऊन सपत्नीक ड्झ चहा रगडा कॉफीचा आस्वाद घेऊन चर्चा केली.

१२ जुलै२६ रोजी प्रसिद्ध मराठी उद्योजक मॅब एव्हिएशन चे संस्थापक व संचालक मंदार भारदे यांनी सिडको येथील लोकप्रिय हॉटेल छत्रपती येथे सदिच्छा भेट दिली.यावेळी हॉटेल मालक एकनाथ लोंढे व बालाजी लोंढे तिरुपती लोंढे यांनी सपत्नीक सत्कार केला. यावेळी उपस्थित माजी समाज कल्याण अधिकारी बापू दासरी, प्रा. डॉ. विश्वाधार देशमुख,नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष रमेश ठाकूर, सारंग नेरलकर,पत्रकार तिरुपती घोगरे, लक्ष्मण रेवणवार, अर्जुन बेटकर,किशोर हंबर्डे यांच्या सह अनेक जण उपस्थित होते.

मोबाईल वर मागील नऊ वर्षापासून प्रा.डॉ. विश्वाधार देशमुख यांच्या समन्वयातून वाचन कट्टा हा आगळा वेगळा उपक्रम चालवला जातो,त्या उपक्रमाची प्रेरणा घेऊन बालाजी लोंढे आणि तिरुपती लोंढे या दोन भावांनी मिळून कोरोनाच्या काळात




ऑनलाईन भाजीपाला व्यवसाय व कोरोना काळानंतर हॉटेल व्यवसायात यश मिळवले. दैनंदिन व्यवहारातून वडील, काका, भाऊ यांच्या सह अन्य दहा जणांना रोजगार उपलब्ध झाला असून, चहा कॉफीचा आस्वाद घेण्यासाठी सिडको - हडको व ग्रामीणभागातील युवक, जेष्ठ नागरिक,महिला,येत असतात.

१२ जुलै२६ रोजी दैनिक सत्यप्रभा वर्धापन दिन व कै.डॉ.शंकरराव चव्हाण जीवनगौरव व कै.सौ. कुसुमताई चव्हाण पुरस्कार २०२६ वितरण सोहळा प्रसंगी स्मृती पुरस्कार स्वीकारण्यासाठी नांदेड येथे आगमन झाले असता, विमान कंपनीचे मालक मंदार भारदे यांनी वेळातला वेळ काढून लोंढे पाटील यांचे हॉटेल छत्रपती येथे भेट देऊन कौतुक केले व शुभेच्छा दिल्या.

# कोरोना पुन्हा सक्रिय!

अमरावती : आंध्र प्रदेशातील वायएसआर कडप्पा जिल्ह्यात गेल्या काही आठवड्यांत कोरोनाचे आठ रुग्ण आढळले असून दोन जणांचा मृत्यू झाला आहे. नवीन रुग्ण आणि मृत्यूंच्या पार्श्वभूमीवर, आरोग्य अधिका-यांनी तपासणी वाढवली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कडप्पा येथील राजमपेट भागातील एका ५२ वर्षीय व्यक्तीला ताप आणि खोकल्याचा त्रास जाणवत होता. त्याची कोविड-१९ चाचणी पॉझिटिव्ह आली आणि वेल्लोर येथील ख्रिश्चन मेडिकल कॉलेजमध्ये



उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. दुस-या एका प्रकरणात कडपा येथील ४३ वर्षीय व्यक्तीची प्रकृती खालावल्यानंतर त्याला सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याची कोविड-१९ चाचणी पॉझिटिव्ह आली आणि नंतर उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

कडप्पा वैद्यकीय महाविद्यालयातील एका २५ वर्षीय वैद्यकीय विद्यार्थ्यालाही विषाणूची लागण झाली असून, तो सध्या गृह विलगीकरणात उपचार घेत आहे. या दोन मृत्यूंमुळे परिसरात घबराट पसरली. आरोग्य विभागाने तातडीने कारवाई करत जिल्ह्यात विशेष जलद प्रतिसाद पथके तैनात केली. या पथकाने बाधित भागातील सुमारे ४० लोकांकडून नमुने गोळा केले.

### रुग्णांवर उपचार सुरू

जिल्हा आरोग्य अधिका-यांनी जिल्हा परिषदेच्या बैठकीत माहिती दिली की, जिल्ह्यात सध्या कोविड-१९ चे आठ सक्रिय रुग्ण आहेत. विषाणूचा प्रकार ओळखण्यासाठी आणि त्याच्या प्रसाराची पद्धत समजून घेण्यासाठी हे नमुने जीनोम सिक्वेन्सिंगकरिता पुण्यातील प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. आंध्र प्रदेशच्या जिल्हा प्रभारी मंत्री सविता यांनी कडपामध्ये संसर्गाचा पुढील प्रसार रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश अधिका-यांना दिले आहेत.

अहवालानुसार, १८ नमुने निगेटिव्ह आले असून, उर्वरित नमुन्यांच्या अहवालाची प्रतीक्षा आहे. मंत्र्यांनी जिल्हाधिकारी आणि मुख्यमंत्री कार्यालयाशी फोनवर संवाद साधला आणि त्यांना कोविड-१९ च्या मार्गदर्शक तत्त्वांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले.

ताप, खोकला आणि श्वास घेण्यास त्रास होणे यांसारखी लक्षणे असलेल्या लोकांना ओळखून, आवश्यकतेनुसार त्यांना विलगीकरण केंद्रांमध्ये हलवण्याचे आदेशही त्यांनी अधिका-यांना दिले. बाधित भागांमध्ये स्वच्छतेचे उपाय अधिक तीव्र करण्यात आले असून, स्वच्छता आणि निर्जंतुकीकरणाची कामे सुरू आहेत.

# ज्ञानेश्वर माऊलींच्या चरणी सेवा,दिवेघाटात सारणी सांगवीकरांतर्फे वारकऱ्यांना फळ व केळी वाटप

केज/प्रतिनिधी
संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्याचे वारी मार्गा वरील प्रमुख आकर्षण असलेल्या आळंदी ते दिवे घाट दरम्यान,केज तालुक्यातील सारणी सांगवी येथील ग्रामस्थ आणि तरुण मंडळाच्या वतीने वारकऱ्यांना फळ व केळी वाटप करून अनोखी माऊली सेवा करण्यात आली.वारीच्या या पवित्र पर्वात दाखवलेल्या या दातृत्वाबद्दल संपूर्ण केज तालुक्यातून या सहकाऱ्यांचे भरभरून कौतुक आणि अभिनंदन होत आहे.

दिवे घाटात भक्तीचा सागर आणि सेवेचा सोहळा

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा जेव्हा अत्यंत कठीण आणि निसर्गरम्य अशा दिवे घाटातून मार्गस्थ होतो, तेव्हा वारकऱ्यांचा उत्साह आणि थकवा दोन्ही शिगेला पोहोचलेले असतात. अशा वेळी वारकऱ्यांना ऊर्जा मिळावी आणि त्यांच्या रूपाने माऊलींची सेवा घडावी या उदात्त हेतूने सारणी सांगवी ता.केज येथील भाविकांनी एकत्र येत फळ वाटपाचा मोठा उपक्रम राबवला.दिवे

घाटातील अत्यंत उत्साही आणि भक्तीमय वातावरणात हजारो वारकऱ्यांना केळी व इतर फळांचे वाटप करण्यात आले. पुंडलिक वरदा हरी विठ्ठल आणि ज्ञानोबा तुकाराम च्या गजरात वारकऱ्यांनीही हे आदरातिथ्य मोठ्या आनंदाने स्वीकारले.

या मान्यवरांच्या पुढाकाराने



घडली माऊली सेवा सारणी सांगवी येथील सामाजिक कार्यकर्ते आणि तरुण मित्रांच्या विशेष पुढाकाराने हा अन्नदान व फळ वाटपाचा अखंड हरिनाम सेवा यज्ञ पार पडला.याप्रसंगी दत्तात्रय क्षीरसागर, भूषण अण्णा भांगे, प्रवीण ढाकणे,बालू तात्या ठोंबरे माजी सरपंच,अशोक मुंडे, गोविंद घोळवे, बालासाहेब देशमुख, शशिकांत नाईकवाडे, दीपक परबळे, सूर्यकांत चौरे अण्णा, पद्माकर घोळवे पाटील,श्रीकांत भांगे, तात्या आवळे सरपंच आवळेवाडी पुणे व गोविंदराव बप्पा घोळवे यांच्यासह त्यांच्या सर्व सहकारी मित्रांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून अत्यंत शिस्तीत आणि श्रद्धेने वारकऱ्यांची सेवा केली.

केज तालुक्यातून कौतुकाचा वर्षाव

पालखी सोहळ्यात वारकऱ्यांची सेवा करणे हे परमभाग्याचे समजले जाते.सारणी सांगवीकरांनी दूरवरून जाऊन दिवे घाटा सारख्या महत्त्वाच्या टप्प्यावर वारकऱ्यां साठी दाखवलेली ही तत्परता आणि भक्ती पाहून केज तालुक्यातील विविध स्तरातून,राजकीय, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांकडून या सर्व सहकाऱ्यांचे जाहीर अभिनंदन व स्वागत केले जात आहे.सारणी सांगवीकरांची वारी सेवा सध्या तालुक्यात चर्चेचा आणि कौतुकाचा विषय ठरत आहे.

राम मंदिर कथित गैरव्यवहार प्रकरणी शिरूर तालुका काँग्रेसचा

# सिद्धेश्वर मंदिरासमोर रघुपती राघव राजाराम सत्याग्रह

मानूर प्रतिनिधी ह्न
संपूर्ण हिंदुस्तानाचे हृदय स्थान असलेले प्रभू श्रीरामचंद्राच्या राम मंदिराच्या देणगी व्यवस्थापन समितीचा गैरव्यवहार देशभर गाजत आहे या गैरव्यवहार प्रकरणी शिरूर तालुका काँग्रेसच्या वतीने रघुपती राघव राजाराम सत्याग्रह शिरूर तालुक्यातील प्रसिद्ध महादेवाचे मंदिर. सिद्धेश्वरचे मंदिराच्या परिसरात तालुका अध्यक्ष भास्कर तात्या केदार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला तसेच श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या पदाधिकाऱ्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी करणारे निवेदन शिरूर पोलीस ठाण्यात देण्यात आले काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या निर्देश नुसार राज्यभर नऊ जुलै ते १४ जुलै दरम्यान हे आंदोलन राबविण्यात येत आहे काँग्रेस पक्षाच्या आदेशाप्रमाणे शनिवार दिनांक ११





जुलै २०२६ रोजी शिरूर येथील प्रसिद्ध देवस्थान सिद्धेश्वर मंदिरा च्या परिसरामध्ये काँग्रेस पक्षाच्या शिरूर तालुका कार्यकर्त्यांचे रघुपति राघव राजाराम सत्याग्रह करण्यात आला या सत्याग्रह दरम्यान रघुपती राघव राजाराम हे भजन . खरा तो एकची धर्म आणि पसायदान करून समारोप करण्यात आला आंदोलनादरम्यान पक्षाचा झेंडा वापरण्यात आलेला नाही अत्यंत शांतते पद्धतीने लोकशाही मार्गाने हे आंदोलन काँग्रेस कार्यकर्त्या श्रीराम भक्त नागरिक शेतकऱ्याकडून करण्यात आले आंदोलन करणाऱ्यांची अशी मागणी होती की राम जन्मभूमी ट्रस्टच्या देणगी अपहरण प्रकरणी निपक्षपणे चौकशी करून जोशीवर कठोर कारवाई करण्यात यावी ही सर्व राम भक्तांची व नागरिकांची मागणी होती यावेळी तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्ते. तालुकाध्यक्ष भास्कर तात्या केदार.

# माजी तहसीलदार राकेश गिड्डे मृत्यू प्रकरणी नातेवाईकांचा ‘यू-टर्न’

## घातपात नाही अपघातच असल्याचे दिले स्पष्टीकरण

केज/प्रतिनिधी
येथील तत्कालीन तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या अपघाती निधनाचा तपास लातूर येथील स्थानिक गुन्हे शाखेने पूर्ण केला आहे सुरुवातीला या प्रकरणावर गंभीर शंका उपस्थित करणाऱ्या गिड्डे यांच्या नातेवाईकांनी आता ‘हा घातपात नसून अपघातच आहे’ असा यू-टर्न घेतल्याने केज तालुक्यासह संपूर्ण महसूल वर्तुळात उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे.

विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशावरून हा तपास लातूर एलसीबीकडे वर्ग करण्यात आला होता.सुरुवातीला तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या पत्नी, भाऊ आणि वडील यांनी महसूल खात्यातीलच काही कर्मचाऱ्यांवर संशय व्यक्त करत घातपाताची शंका उपस्थित केली होती. मात्र,लातूरचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांना जून महिन्यात गिड्डे यांच्या



सर्व नातेवाईकांनी स्वाक्षरी करून एक निवेदन दिले.तपासाच्या रेकॉर्ड वरील सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पुराव्यांचे अवलोकन केल्यानंतर हा घातपात नसून केवळ एक अपघातच असल्या बाबत नातेवाईकांचे समाधान झाले असल्याचे या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.डाव्या बाजूच्या सातही बरगड्या तुटल्या होत्या

राकेश गिड्डे यांच्या पार्थिवाचे शवविच्छेदन (पोस्टमार्टम) करणारे रेणापूरचे वैद्यकीय अधिकारी डॉ.राहुल हाडबे यांनी सांगितले की,अपघातामध्ये गिड्डे यांच्या पूर्ण डाव्या बाजूला गंभीर मार लागला होता.त्यांच्या डाव्या बाजूच्या सातही बरगड्या तुटल्या होत्या.या गंभीर दुखापतीमुळेच त्यांचा मृत्यू ओढवल्याचे वैद्यकीय अहवालातून समोर आले आहे. दरम्यान याप्रकरणी केज तालुक्यात उलट सुलट चर्चांना उधाण आले होते.

### २८ जणांचे जबाब नोंदवले

या प्रकरणाच्या तपासा दरम्यान तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या मोबाईलच्या सीडीआर वरून (कॉल डिटेल रेकॉर्ड) अनेक बाबी तपासण्यात आल्या. अपघातापूर्वीच्या दोन दिवसांत त्यांच्या संपर्कात आलेल्या २८ हून अधिक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे जबाब लातूर गुन्हे शाखेने नोंदवले असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे यांनी दिली.

# गोकुंदा रेल्वे उड्डाणपूल रखडल्याप्रकरणी आमदार भीमराव केराम आक्रमक

## राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाकडे तक्रार, तातडीच्या कारवाईची मागणी

किनवट : नांदेड जिल्ह्यातील दुर्गम आदिवासी व पेसा क्षेत्र असलेल्या किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघातील गोकुंदा येथील राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ वरील रेल्वे उड्डाणपूलाचे काम तब्बल आठ वर्षांपासून रखडल्याने आदिवासी नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी आमदार भीमराव केराम यांनी राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाचे अध्यक्ष मा. अंतरसिंह आर्य यांच्याकडे सविस्तर निवेदनाद्वारे केली आहे.

आमदार केराम यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, गोकुंदा ग्रामपंचायत ही पेसा कायदा, १९९६ अंतर्गत अधिसूचित आदिवासी क्षेत्र असून राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ हा हैद्राबाद, माहूर, नांदेड आणि नागपूरला जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. या मार्गावरील रेल्वे उड्डाणपुलाला अनेक वर्षांपूर्वी मंजुरी मिळूनही भारतीय रेल्वे आणि भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे आजपर्यंत काम पूर्ण झालेले नाही.

या विलंबामुळे शेतकरी, विद्यार्थी,



रुग्ण, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांना दररोज वाहतूक कोंडीचा व जीवितहानीचा धोका पत्करावा लागत आहे. वेळेत उपचार न मिळाल्याने रुग्णांना त्रास सहन करावा लागतो, तर विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक व्यवहारांवरही त्याचा विपरीत परिणाम होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

आमदार केराम यांनी संविधानातील कलम ४६, कलम ३३८-अ, तसेच पेसा अधिनियम, १९९६ चा उल्लेख करून आदिवासी भागातील पायाभूत सुविधांचा विकास हा शासनाचा घटनात्मक दायित्व असल्याचे नमूद केले आहे.

राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाने रेल्वे मंत्रालय, रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (छक-ख) आणि महाराष्ट्र शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीने संयुक्त बैठक बोलवावी, उड्डाणपूल पूर्ण करण्यासाठी निश्चित कालमर्यादा जाहीर करावी, आयोगाच्या पथकाकडून प्रत्यक्ष पाहणी करून आठ वर्षांच्या विलंबासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची शिफारस करावी, तसेच या प्रकरणाचा नियमित आढावा घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

दुर्गम आदिवासी भागातील नागरिकांना सुरक्षित, अखंड आणि सन्मानजनक दळणवळण सुविधा मिळणे हा त्यांचा घटनात्मक अधिकार आहे. गोकुंदा रेल्वे उड्डाणपूलाचे काम तातडीने पूर्ण होणे ही काळाची गरज असून राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाने या प्रकरणात त्वरित हस्तक्षेप करावा, असे आवाहन आमदार भीमराव केराम यांनी केले आहे.

# कहाळा (बु.) ग्रामपंचायतीत विकासाच्या नावाखाली लाखोंचा निधी गायब?

## ग्रामस्थांचा गंभीर आरोप, चौकशीची मागणी

नायगाव तालुक्यातील कहाळा (बु.) ग्रामपंचायतीच्या कारभारावर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रशासकाने अधिकार नसताना पाच लाखांहून अधिक रक्कम उचलल्याचा आरोप समोर आल्यानंतर आता ग्रामस्थांनी मागील दहा वर्षांतील ग्रामपंचायतीच्या संपूर्ण आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्याची मागणी केली आहे. विकासकामांच्या नावाखाली लाखो रुपयांचा निधी खर्च झाल्याचे कागदोपत्री दाखविण्यात आले असले, तरी प्रत्यक्षात गावात मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने निधी नेमका गेला कुठे, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गेल्या दहा वर्षांपासून ग्रामपंचायतीचा कारभार अत्यंत भोंगळ पद्धतीने सुरू आहे. गावात नळाद्वारे नियमित पाणीपुरवठा होत नाही, अनेक रस्त्यांची अवस्था बिकट झाली आहे, नाल्या तुंबलेल्या असून स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला आहे. गावातील अनेक हातपंप नादुरुस्त अवस्थेत असल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च झाल्याचा दावा केला जात असला, तरी त्याचा प्रत्यक्ष लाभ ग्रामस्थांना झालेला नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.

ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, ग्रामपंचायतीच्या खात्यातून विकासकामांच्या नावाखाली लाखो रुपयांचा निधी उचलण्यात आला. मात्र, त्या निधीतून गावाचा अपेक्षित विकास झालेला दिसत नाही. उलट, पदावर असलेले काही कारभारी आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्याची चर्चा गावात आहे. मागील काळातील काही सरपंच, सदस्य आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या कार्यकाळात शेती खरेदी, घरे बांधणे तसेच शहरात भूखंड घेणे अशा प्रकारे वैयक्तिक प्रगती झाल्याचे ग्रामस्थ सांगत असून, गावाच्या विकासाकडे मात्र दुर्लक्ष झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

यापूर्वी ग्रामपंचायतीतील कथित गैरव्यवहाराच्या प्रकरणात तत्कालीन ग्रामविकास अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. त्यानंतरही आर्थिक व्यवहारांबाबतचे प्रश्न कायम राहिल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यातच प्रशासक कार्यकाळात पाच लाखांहून अधिक रक्कम उचलल्याची बाब समोर आल्याने संपूर्ण प्रकरण अधिकच गंभीर बनले आहे.

ग्रामस्थांनी वेळोवेळी संबंधित प्रशासनाकडे तक्रारी करून तसेच वृत्तपत्रांतूनही हा विषय मांडून लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याची दखल घेतली गेली नसल्याचा आरोप आहे. उलट, तक्रार करणाऱ्या नागरिकांना उद्धट वागणूक देत जे करायचे ते करून घ्या असे उघड आव्हान देण्यात आल्याचाही ग्रामस्थांचा दावा आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर कहाळा (बु.) ग्रामपंचायतीतील गेल्या दहा वर्षांतील आर्थिक व्यवहार, विकासकामे, निधी खर्च तसेच प्रशासक कार्यकाळातील व्यवहारांची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



# ‘साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे गौरव पुरस्कार २०२६’ नांदेडमध्ये मान्यवरांचा होणार सन्मान!

नांदेड जिल्हा प्रतिनिधी
लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती सोहळ्याचे औचित्य साधून, यंदाच्या ’साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे गौरव पुरस्कार २०२६’ सोहळ्याचे आयोजन १ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आले आहे. या पुरस्कारासाठी विविध क्षेत्रांतील समाजभूषणांची निवड करण्यासाठी ’लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती संयोजन समिती’ची एक महत्त्वपूर्ण बैठक १२ जुलै २०२६ रोजी स्थळ: डी. आर. टट्टू वसंत नगर, नांदेड येथे पार पडली. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वैद्यकीय, साहित्य, कला, वाणिज्य, विज्ञान, उद्योग, देशसेवा आणि पत्रकारिता या क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय व दर्जेदार कार्य करणाऱ्या मान्यवरांना या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि ग्रंथ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

या संपूर्ण सोहळ्याच्या पूर्वतयारीसाठी आणि नियोजनासाठी लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे जयंती संयोजन समितीच्या वतीने विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत व नियोजनात युवा साहित्यिक सोनू दरेगावकर, संजय गायकवाड, अंगद भालेराव, शिवाजी रेड्डी, लहुदास भालेराव, दत्तप्रसाद तालीमकर, ॲड. ज्ञानेश्वर सूर्यवंशी, विनोद पाचंगे आणि साहेबराव वाघमारे या समिती सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. पुरस्कार विजेत्यांची अधिकृत यादी समितीच्या वतीने येत्या १८ जुलै २०२६ रोजी जाहीर केली जाईल, अशी माहिती संयोजन समितीने दिली आहे.

# अंबड बसस्थानक हिरवाईने बहरले

## ४०० वृक्षांचे रोपण हरित स्वप्न साकार मियावाकी घनवनाच्या निर्मितीला प्रारंभ

अंबड प्रतिनिधी :-
पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश देत अंबड बसस्थानक परिसरात तब्बल ४०० मोठ्या १० ते १२ फूट उंचीच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. विशेष म्हणजे बसस्थानकाच्या दक्षिणेकडील प्रवेशद्वाराजवळ मियावाकी पद्धतीचे घनदाट वन विकसित करण्याच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमालाही प्रारंभ झाला आहे.

या उपक्रमाची पूर्वतयारी म्हणून शनिवारी जेसीबीच्या साहाय्याने खड्डे खोदण्याचे काम करण्यात आले. या कामाचा शुभारंभ अखिल भारतीय मारवाडी युवा मंचचे पर्यावरण मंत्री राहुल अग्रवाल,संतोष जोशी,कैलास राठी,शैलेश तिवारी तसेच सेवानिवृत्त महसूल अधिकारी शिवाजी गाडेकर यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आला.रविवार दि.१२ जुलै २०२६ रोजी या उपक्रमाला सामाजिक आणि आध्यात्मिक स्वरूप लाभले. जळगाव जिल्ह्यातील वारकरी तसेच सिंदखेडराजा येथून पंढरपूरकडे निघालेल्या वारी विवेकाची मधील वारकऱ्यांनी वृक्षारोपणात सहभागी होत वृक्ष लावा पर्यावरण वाचवा हा संदेश दिला.याशिवाय मत्स्योदरी विद्यालयाचे भागवत काळे




आणि चिमुकल्या खेळाडूंनी श्रमदान करून उपक्रमात मोलाचे योगदान दिले.अंबड आगारातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही उत्स्फूर्तपणे श्रमदान करत वृक्षारोपण यशस्वी केले. वृक्षांची लागवड पूर्ण होताच त्यांना तत्काळ दोन टँकरद्वारे पाणी देऊन त्यांच्या संवर्धनाची काळजी घेण्यात आली.यावेळी अंबड आगाराचे डेपो मॅनेजर विश्वजीत तेली स्थानक प्रमुख विकास चव्हाण, वाहतूक नियंत्रक केशव महाराज कावळे,प्रेमचंद चव्हाण,सामाजिक कार्यकर्ते व यशवंत व्याख्यानमालेचे संजय खोरे,धनंजय गुळवणे आणि देवा चित्राल यांची प्रमुख उपस्थिती होती.या संपूर्ण हरित उपक्रमासाठी अखिल भारतीय मारवाडी युवा मंच, अंबड यांनी जेसीबी उपलब्ध करून देण्यापासून वृक्ष लागवडीपर्यंत महत्त्वपूर्ण सहकार्य केले.अंबड बसस्थानक परिसरात उभारले जाणारे हे मियावाकी घनवन भविष्यात पर्यावरण संवर्धन जैवविविधता वाढ आणि प्रवाशांना स्वच्छ हिरवागार परिसर उपलब्ध करून देणारा आदर्श प्रकल्प ठरणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात गीतगायन व शुध्दलेखन स्पर्धा संपन्न

केज/प्रतिनिधी
स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड येथे दिनांक १२ जुलै २०२६ रोजी सकाळी १० ते ०२ या वेळात गीतगायन स्पर्धा व शुध्दलेखन स्पर्धा घेण्यात आल्या.

गीतगायन स्पर्धेत प्रथम यशवंत सौदागर व द्वितीय अक्षरा सौदागर यांनी प्राविण्य मिळविले.तर शुद्धलेखन स्पर्धेत प्रथम चरावंत सौदागर व द्वितीय आनंद गायकवाड यांनी प्राविण्य मिळविले. दोन्ही स्पर्धेचे परिक्षक म्हणून रविंद्र गायकवाड(पेंटर) यांनी काम पाहिले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कमलाकर साबळे, दादासाहेब गायकवाड, नारायण गायकवाड, शिवाजी गायकवाड,




सुभाष गायकवाड, वामन गायकवाड, संभाजी लवटे,ए.बी. गायकवाड यांची उपस्थिती होती.विजयी स्पर्धकांना कार्यक्रमाचे अध्यक्ष,समाजसेवक, डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड व शिवाजी सौदागर यांच्या हस्ते सन्मानपत्र व प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

स्पर्धकांनी स्पर्धेत टिकून राहण्यासाठी जिद्द व चिकाटीने आणि सातत्याने प्रयत्न करावेत असे आवाहन अध्यक्षीय समारोप करताना डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.

# प्रभाग क्र. १० कोरबू गल्लीतील अतिक्रमण धारकांचे सर्वेक्षण करून पी.टी.आर. वाटप करा : सय्यद एजाज

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील प्रभाग क्रमांक १० मधील कोरबू गल्ली परिसरात अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या गरीब व गरजू अतिक्रमण धारकांचे तातडीने सर्वेक्षण करून पात्र कुटुंबांना पी.टी.आर. वाटप करण्यात यावे, अशी मागणी माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी गेवराई नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, कोरबू गल्ली परिसरात अनेक कुटुंबे अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत राहत असून त्यांच्या घरांची नोंद अधिकृत पी.टी.आर.मध्ये नसल्यामुळे त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यात अडचणी येत आहेत. विशेषतः प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल योजना) अंतर्गत लाभ मिळवण्यासाठी जागेचा अधिकृत पुरावा म्हणून पी.टी.आर. आवश्यक असल्याने अनेक पात्र कुटुंबे घरकुलाच्या लाभापासून वंचित राहत आहेत.

सध्या या परिसरातील अनेक नागरिक कच्च्या व जीर्ण घरांमध्ये वास्तव्यास असून पावसाळ्यासह इतर ऋतूंमध्ये त्यांना मोठ्या संकटांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे नगरपरिषद प्रशासनाने तातडीने या भागातील सर्व अतिक्रमण धारकांचे सर्वेक्षण करून पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करावी आणि नियमानुसार त्यांना पी.टी.आर. वाटप करण्याची प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी सय्यद एजाज यांनी केली आहे.घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन या विषयाला नगरपरिषद प्रशासनाने सर्वोच्च प्राधान्य द्यावे, जेणेकरून गरीब व गरजू कुटुंबांना त्यांच्या हक्काचे घरकुल मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.



# सोनिजवळा येथील ज्येष्ठ महिला भामाबाई पाखरे यांचे वृद्धापकाळाने निधन, परिसरात शोककळा

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील सोनिजवळा येथील ज्येष्ठ महिला भामाबाई बाबुराव पाखरे यांचे रविवार,दिनांक १२ जुलै २०२६ रोजी दुपारी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय अंदाजे ६५ वर्ष होते. त्यांच्या निधनाने सोनिजवळा आणि केज परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. भामाबाई पाखरे या सोनिजवळा येथील ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव श्री. शंकरराव पाखरे व पुणे येथील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक श्री.अशोक पाखरे यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात मुले, सुना,मुली,नातवंडे असा मोठा आप्त परिवार आहे.

आज होणार अंत्यविधी

पाखरे कुटुंबावर आलेल्या या दुःखद प्रसंगामुळे परिसरात शोककळा पसरली आहे.दिवंगत भामाबाई पाखरे यांच्या पार्थिवा वर सोमवार,दिनांक १३ जुलै रोजी सकाळी ठीक ८-३० वाजता सोनिजवळा येथील त्यांच्या राहत्या शेतात अंत्यविधी पार पडणार असल्याची माहिती त्यांच्या कौटुंबिक सूत्रांनी दिली आहे. दरम्यान त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच परिसरात शोककळा पसरली आहे.



# लातूर मंडळात प्रथम आलेल्या कु. इशिता पत्की व मुख्याध्यापक कृष्णकुमार नेम्मानीवार यांचा भव्य सत्कार

किनवट । प्रतिनिधी

इयत्ता दहावीच्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या परीक्षेत १०० टक्के गुण मिळवून लातूर विभागात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या कु. इशिता शिरीष पत्की हिचा तसेच तिच्या यशामागे मोलाचे मार्गदर्शन करणारे शाळेचे मुख्याध्यापक कृष्णकुमार व्यंकटराव नेम्मानीवार यांचा लातूर येथे भव्य सत्कार करण्यात आला. दि. ११ जुलै २०२६ रोजी लातूर येथील दयानंद महाविद्यालयात आयोजित गुणवंत विद्यार्थी व मुख्याध्यापकांच्या सन्मान सोहळ्यात हा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास शिक्षक आमदार विक्रम काळे, महाराष्ट्र शासनाचे सहकार मंत्री, लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री, पंढरपूर देवस्थान समितीचे कार्यकारी अध्यक्ष तसेच शिक्षण विभागातील वरिष्ठ



अधिकारी व विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते कु. इशिता पत्की व मुख्याध्यापक कृष्णकुमार नेम्मानीवार यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. उपस्थितांनी विद्यार्थिनीच्या अभूतपूर्व यशाचे आणि शाळेच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक कार्याचे कौतुक केले. या उल्लेखनीय यशामुळे शाळेचे, संस्थेचे तसेच संपूर्ण किनवट तालुक्याचे नाव राज्यभर उज्ज्वल झाले असून, हा सन्मान विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारा असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. याप्रसंगी इशिता पत्की हिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या, तर मुख्याध्यापक नेम्मानीवार यांच्या नेतृत्वाखाली शाळेने साधलेल्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वाटचालीचेही विशेष कौतुक करण्यात आले. या गौरवामुळे संपूर्ण तालुक्यात आनंदाचे वातावरण असून विविध स्तरांतून कु. इशिता पत्की, मुख्याध्यापक कृष्णकुमार नेम्मानीवार तसेच शाळेच्या शिक्षकवृंदाचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# विद्यार्थ्यांनी शारीरिक मानसिक नैतिकदृष्ट्या सक्षम बनणे काळाची गरज-रणवीर पंडित

## यमादेवी विद्यालयातील शिवकालीन स्व-संरक्षण प्रशिक्षण शिबिराचा उत्साहात समारोप

गेवराई (प्रतिनिधी)

यमादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जातेगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या १२ दिवसीय शिवकालीन स्व-संरक्षण व युद्धकला प्रशिक्षण शिबिराचा उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. यावेळी बोलताना शारदा स्पोर्ट्स केडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शारीरिक मानसिक नैतिकदृष्ट्या सक्षम बनणे काळाची गरज असून त्यासाठी विद्यार्थ्यांनी क्रीडाक्षेत्राकडे वळावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यमादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जातेगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या १२ दिवसीय शिवकालीन स्व-संरक्षण व युद्धकला प्रशिक्षण शिबिराचा उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. समारोपाच्या कार्यक्रमाला शारदा स्पोर्ट्स केडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, माजी जिल्हा परिषद सदस्य साहेबराव पांढरे, शंकर पवार, सरपंच रमेश चव्हाण, पत्रकार दत्ता वाघमारे, राधेश्याम लेंडाळ, रामेश्वर चव्हाण, विशाल पांढरे, शिवाजी धोंडरे, विठ्ठल सोनवणे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



शिबिरात विद्यार्थ्यांनी दांडपट्टा, भाला, काठी, स्व-संरक्षणाची विविध तंत्रे तसेच पारंपरिक मर्दानी खेळांची प्रभावी प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली असून शाळेच्या बदलत्या वाटचालीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

समारोप कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले रणवीर पंडित यांनी विद्यार्थ्यांनी शारीरिक, मानसिक आणि नैतिकदृष्ट्या सक्षम बनणे ही काळाची गरज असल्याचे सांगत त्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक तथा प्राचार्य सतीश गरड यांच्या नेतृत्वाखाली विद्यालयाने गेल्या काही वर्षांत उल्लेखनीय प्रगती साधली असून शिस्त, गुणवत्तापूर्ण शिक्षण, विविध उपक्रम आणि सकारात्मक शैक्षणिक वातावरणामुळे विद्यालयाची नवी ओळख निर्माण होत असल्याचे यावेळी अनेक मान्यवरांनी नमूद केले. शाळेत कोणत्याही प्रकारच्या राजकारणाला स्थान न देता विद्यार्थ्यांचे हित आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण हेच सर्वोच्च प्राधान्य राहील, असा निर्धारही व्यक्त करण्यात आला.शिबिरासाठी निःस्वार्थ भावनेने प्रशिक्षण देणारे प्रशिक्षक शरद पाटील यांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला तसेच शाळेच्या प्रगतीसाठी सहकार्य करणाऱ्या ग्रामस्थ, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानण्यात आले.

यावेळी शिक्षक प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ, पदाधिकारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'जनतेच्या एकजुटीचा विजय' जालना-वडीगोद्री राष्ट्रीय महामार्गावरील गतिरोधकांना अखेर हिरवा कंदील

## शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठान व ग्रामस्थ यांच्या पाठपुराव्याला यश..

घुंगर्डे हादगाव/ प्रतिनिधी

जालना-वडीगोद्री राष्ट्रीय महामार्गावरील सुखापुरी फाटा,शहापूर धाकलगाव,मठ तांडा आणि झिरपी तांडा या अपघातप्रवण ठिकाणी अखेर गतिरोधक उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.वारंवार होणारे भीषण अपघात,नागरिकांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि रस्ता रोको आंदोलनाच्या इशाऱ्याची दखल घेत राष्ट्रीय महामार्ग विभागाने संबंधित ठिकाणी डांबरी गतिरोधक उभारण्यास मंजुरी दिली असून पुढील ७ दिवसांत काम पूर्ण करण्यात येईल,असे लेखी आश्वासन प्रशासनाने आंदोलकांना दिले.त्यानंतर शहापूर येथे नियोजित रस्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले.जालना-वडीगोद्री राष्ट्रीय महामार्गावरील सुखापुरी फाटा,शहापूर,धाकलगाव,मठ तांडा आणि झिरपी तांडा परिसरात गेल्या काही महिन्यांत अनेक गंभीर अपघात घडले असून अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे.तर शेकडो नागरिक जखमी झाले आहेत.या दुर्घटनांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.याबाबत ग्रामपंचायत झिरपी तांडा,शहापूर येथील शैक्षणिक संस्था,स्थानिक नागरिक तसेच शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठान यांनी वारंवार निवेदने देऊन गतिरोधक




उभारण्याची मागणी केली होती.नागरिकांच्या सातत्यपूर्ण मागणीनंतर राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करून सविस्तर अहवाल जिल्हा रस्ता सुरक्षा समितीकडे सादर केला.त्यानंतर जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत या विषयावर चर्चा होऊन संबंधित ठिकाणी गतिरोधक उभारण्यास मान्यता देण्यात आली.तसेच कंत्राटदाराला आवश्यक निर्देशही देण्यात आले आहेत.दरम्यान,राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पाठविलेल्या अधिकृत पत्रानुसार संबंधित ठिकाणी डांबरी गतिरोधकाचे काम विहित तांत्रिक मानकांनुसार प्राधान्याने करण्यात येणार असून ७ दिवसांच्या आत काम पूर्ण करण्याचे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.हे लेखी पत्र राष्ट्रीय महामार्ग विभागाचे कनिष्ठ अभियंता अक्षय कंदले यांनी आंदोलक व ग्रामस्थांच्या स्वाधीन केले.लेखी आश्वासन मिळाल्यानंतर शहापूर येथे प्रस्तावित रस्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले.यावेळी कनिष्ठ अभियंता अक्षय कंदले यांनी ग्रामस्थांशी संवाद साधून प्रशासनाच्या वतीने गतिरोधक उभारणीबाबत सकारात्मक भूमिका स्पष्ट केली.या मागणीला यश मिळवून देण्यासाठी शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठान व झिरपी तांडा ते धाकलगाव परिसरातील ग्रामस्थांनी सातत्याने पाठपुरावा केला. या प्रक्रियेत जिल्हाधिकारी आशिमा मित्तल,पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल,सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता नीता पवार,कार्यकारी अभियंता ए.ए.खैरदी,उपविभागीय अभियंता आर.जी.पल्लेवार,कनिष्ठ अभियंता अक्षय कंदले तसेच सहाय्यक पोलिस निरीक्षक अमोल गुरले यांनी आवश्यक मार्गदर्शन व समन्वय साधला.

यावेळी शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा.आर.व्हि.छल्लारे,स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष सुरेश काळे,सरपंच इलियास पठाण,दशरथ साठे,विलास पवार,राधाकिशन मैंद,राजेंद्र सोळुंके,महादेव बोडके,राजेंद्र पवार,कीर्तिनंद गांगुर्डे,अशोक गायकवाड,दत्ता शिंदे,लक्ष्मण भडांगे,सचिन साळुंके,पोलिस पाटील सोपान शिंदे,विलास लांडगे, ड.मोहन रोटे,राजेंद्र कापसे,अंगद मिरदुडे,नामदेव गाढे, तान्हाजी धुमाळ,सचिन आमटे,दिगंबर शेंडगे,विठ्ठल लगड,कार्तिक सुर्यवंशी,सखाराम परमेश्वर,शकील शेख,यशवंत खनके,राजेंद्र शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ बी.ए. मराठी अभ्यासक्रमात 'कल्लोळ'मधील 'जगण्याची वाताहत'चा समावेश

किनवट । प्रतिनिधी दि.१२ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अंतर्गत बी.ए. तृतीय वर्षाच्या मराठी अभ्यासक्रमात डॉ. वसंत भा. राठोड यांच्या 'कल्लोळ' आत्मकथनातील 'जगण्याची वाताहत' या प्रकरणाचा समावेश करण्यात आला आहे. नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील आंदबोरी (चि.) येथील रहिवासी असलेल्या डॉ. राठोड यांनी वाडी-तांड्यातील कष्टकरी, भटक्या-विमुक्त आणि आदिवासी समाजाच्या संघर्षमय जीवनाचे वास्तव आपल्या लेखनातून प्रभावीपणे मांडले आहे. या समावेशामुळे ग्रामीण साहित्याला मोठी दखल मिळाल्याची भावना साहित्यप्रेमींनी व्यक्त केली आहे. दरम्यान, या यशानिमित्त राज्यभरातून मिळालेल्या शुभेच्छा व अभिनंदनाबद्दल डॉ. राठोड यांनी सर्व स्नेही, साहित्यप्रेमी आणि हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार मानत, त्यांच्या सद्भावना पुढील साहित्यनिर्मितीस प्रेरणा देणाऱ्या असल्याचे सांगितले.




# आमदार सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला यश; आष्टीचे नवीन बसस्थानक सेवेस सज्ज, प्रवाशांच्या प्रतीक्षेला अखेर पूर्णविराम..!

## अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर विकासाचे चक्र गतिमान; आता आष्टीला आधुनिक, स्वच्छ, डिजिटल आणि आदर्श बसस्थानकाची अपेक्षा

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी शहराच्या विकासाशी आणि हजारो प्रवाशांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेला नवीन राज्य परिवहन बसस्थानकाचा बहुप्रतीक्षित प्रश्न अखेर मार्गी लागण्याच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या या प्रकल्पाला आता प्रत्यक्ष गती मिळत असून, आमदार सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि संबंधित विभागांच्या समन्वयातून बसस्थानक सुरू करण्याच्या प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचल्या आहेत.

वर्षानुवर्षे जुन्या बसस्थानकातील अपुऱ्या सुविधा, अस्वच्छता, गर्दी, धूळ, चिखल आणि गैरसोयींचा सामना करणाऱ्या प्रवाशांसाठी ही बातमी मोठा दिलासा देणारी ठरत आहे. विद्यार्थी, शेतकरी, कामगार, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामीण भागातील प्रवासी यांना दररोज भेडसावणाऱ्या अडचणी आता इतिहासजमा होण्याची आशा निर्माण झाली आहे.

नवीन बसस्थानक हे केवळ प्रवासी वाहतुकीचे केंद्र नसून आष्टीच्या बदलत्या विकासदृष्टीचे प्रतीक ठरणार आहे. दि. ५ जुलै रोजी आमदार सुरेश धस यांनी अधिकाऱ्यांना कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्यानंतर प्रशासकीय यंत्रणा अधिक वेगाने कार्यरत झाली. त्यानंतर झालेल्या पाहणीत विद्युत विभागाची सर्व कामे पूर्ण झाल्याचे स्पष्ट झाले असून उर्वरित किरकोळ कामेही पूर्णत्वाकडे वाटचाल करत आहेत.

विशेष म्हणजे हा प्रकल्प केवळ एका विभागाचा किंवा एका व्यक्तीचा नसून अनेक वर्षांच्या काळात विविध स्तरांवर झालेल्या प्रयत्नांचे फलित असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. लोकप्रतिनिधी, प्रशासन, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक यांच्या अपेक्षांचे केंद्रबिंदू बनलेले हे बसस्थानक आता प्रत्यक्ष सेवेत येण्याच्या मार्गावर आहे.



मात्र आष्टीकरांच्या अपेक्षा यापुढे आणखी मोठ्या आहेत. बसस्थानक सुरू होणे हा शेवट नसून विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात असल्याचे नागरिकांचे मत आहे. बसस्थानक परिसरात आधुनिक डिजिटल माहिती प्रणाली, सीसीटीव्ही सुरक्षा व्यवस्था, स्वच्छ आणि सुसज्ज प्रतीक्षागृह, आकर्षक प्रकाशयोजना, हरित परिसर, दिव्यांगस्नेही सुविधा, महिलांसाठी स्वतंत्र सुविधा आणि कायमस्वरूपी स्वच्छता व्यवस्थापन यांचा समावेश व्हावा, अशी मागणी जोर धरत आहे.

आष्टी हे तालुक्याचे व्यापारी, शैक्षणिक आणि प्रशासकीय केंद्र म्हणून झपाट्याने विकसित होत असताना, येथील बसस्थानकही त्या विकासदृष्टीला साजेसे असणे काळाची गरज असल्याचे मत जाणकार व्यक्त करत आहेत. आज राज्यातील अनेक तालुक्यांमध्ये आधुनिक सुविधा उपलब्ध होत असताना आष्टीनेही विकासाच्या या शर्यतीत आघाडीवर राहावे, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

लोकभावना

नागरिकांचे म्हणणे आहे की, रखडलेली कामे पूर्ण होणे ही निश्चितच समाधानाची बाब आहे; मात्र खरा आनंद तेव्हाच मिळेल जेव्हा बसस्थानक स्वच्छता, सुविधा, सुरक्षा आणि व्यवस्थापनाच्या बाबतीत जिल्ह्यात आदर्श ठरेल. विकासकामांचे खरे मूल्यमापन उद्घाटनाच्या फितीने होत नाही, तर त्या सुविधेचा लाभ घेणाऱ्या सामान्य नागरिकांच्या चेहऱ्यावर उमटणाऱ्या समाधानाने होत असते.

आज आष्टीकरांना कोणावर टीका नको आहे, तर विकासाची गती हवी आहे. कोणाचे श्रेय मोठे आणि कोणाचे लहान यापेक्षा आष्टीचा विकास मोठा व्हावा, हीच जनतेची अपेक्षा आहे. कारण राजकारणाचा कालावधी मर्यादित असतो, परंतु विकासकामांचा लाभ अनेक पिढ्यांना मिळत असतो.

नवीन बसस्थानकाचे दरवाजे प्रवाशांसाठी खुलले, परिसर सुशोभित झाला, डिजिटल सुविधा उपलब्ध झाल्या आणि स्वच्छता कायम राखली गेली, तर हे बसस्थानक केवळ वाहतुकीचे केंद्र राहणार नाही; तर आष्टीच्या प्रगतीची, नियोजनाची आणि विकासाभिमुख विचारांची ओळख बनणार आहे. याच अपेक्षेने आज संपूर्ण आष्टी तालुक्याचे लक्ष या बहुप्रतीक्षित प्रकल्पाकडे लागले आहे.